Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १९९ * * नागपूर *

शनिवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## शुक्रवारी २७ विमानांना बॉम्बची धमकी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५:**

देशातील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवासी विमानांना बॉम्बच्या धमक्या सुरूच आहेत. शुक्रवारी २७ विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इंडिगो, विस्तारा आणि स्पाइसजेटच्या प्रत्येकी सुमारे ७ फ्लाइट्स, तर एअर इंडियाच्या ६ फ्लाइट्सना धमक्या आल्या आहेत.

बॉम्बच्या धमक्या मिळालेल्या सातपैकी सहा इंडिगो फ्लाइट्समध्ये ६ ए २०९९ (उदयपूर ते दिल्ली), ६ ए ११ (दिल्ली ते इस्तंबूल), ६ ए ५८ (जेद्दाह ते मुंबई), ६ ए १७ (मुंबई ते इस्तंबूल), ६ ए १०८ (हैदराबाद ते चंदिगड) यांचा समावेश आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## ब्रिक्समधील भारताचेही महत्त्व

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिक्स संघटनेच्या बैठकीसाठी रशियाला जाऊन आले. ब्रिक्स म्हणजे भारत, रशिया, चीन, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या राष्ट्रांच्या पुढाकाराने जन्माला झालेली संघटना आहे. रशिया जेव्हा सोव्हिएत संघाचे नेतृत्व करीत होता. त्यावेळी जगात अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात स्पर्धा चालत असे. 1971 च्या भारत पाक युद्धात अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष निक्सन यांनी भारत पाकिस्तानच्या लढाईत अमेरिकेचा सातवा आरमारी वेढा पाठवण्याचा निर्णय कळवला होता. तेव्हा भारताने रशियाबरोबर करार करून त्याला तुल्यबळ शक्ती उभी केल्याने अमेरिकेने पाकिस्तानला मदत केली नाही. सोव्हिएत संघाचे विघटन झाल्यावर जागतिक शक्ती म्हणून एकमात्र बलाढ्य देश म्हणून अमेरिकेचे नाव घेतले जात होते. अमेरिकेचा मुकाबला करायची शक्ती एकट्या रशियात त्याकाळीही नव्हती. त्यामुळेच बरेच दिवस अमेरिकेचे दादागिरी जगात चालू होती. गेल्या पंधरा-वीस वर्षात रशिया आणि चीन यांची अर्थव्यवस्था झपाट्याने दौडत होती. सध्या रशिया युक्रेन विरुद्धच्या युद्धामुळे बेजार असला. तरी त्यांची अर्थव्यवस्था थोडीफारच बिघडलेली दिसते. चीन आणि भारत या आज तरी सर्वाधिक वेगाने चालणाऱ्या अर्थव्यवस्था आहेत. ब्रिक्स मधील हे तीन देश वगळता ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यांची अर्थव्यवस्था तेवढी समाधानकारक नव्हती. त्यापैकी ब्राझीलने आपली अर्थव्यवस्था रुळावर आणलेली दिसते. ब्रिक्स नावाची ही संघटना कोणी कितीही इन्कार केला. तरीही अमेरिकेच्या दादागिरीला पर्याय म्हणून उभी राहिली आहे असे दिसून येते. आत्ता आत्तापर्यंत जगात चलनाच्या बाबतीत अमेरिकेच्या डॉलरला जगभर मान्यता आहे. सध्या अमेरिकेच्या लढाई विरुद्ध असलेल्या कितीतरी देशांना अनेक निबंर्धाचा मुकाबला करावा लागत आहे. त्यात रशिया आणि इराण सारखी राष्ट्रे इतके सारे निर्बंध असूनही तग धरून आहेत. आता ब्रिक्सने अमेरिकेच्या डॉलरला पर्यायी चलन उभे करावे, असे पुतीन यांना वाटते. पण आज घडीला डॉलरला समांतर अर्थव्यवस्था निर्माण करणे शक्य होईल, असे वाटत नाही. आज भारत, रशिया आणि अमेरिका या दोघांसोबत सख्ख्य राखून आहे. चीन, रशिया आणि इराण सोबत अमेरिकेचे वेगळ्या प्रकारचे युद्ध सुरू आहे. भारताने कधीच युद्धाला महत्व दिले नव्हते. आताही रशिया विरुद्ध युक्रेन युद्ध असो किंवा लेबनॉन- इस्त्राइलचे युद्ध असो. भारताने शांततेलाच सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे. भारताला ब्रिक्सचा पर्याय असला, तरी अमेरिकेबरोबरचे संबंध तोडता येत नाहीत.

▸▸ पान ८ वर

## महाविकास आघाडीचा फॉर्म्युला पुन्हा बदलला...

# आता प्रत्येकी ९० जागा लढणार!

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :**



१८ जागा मित्रपक्षांना

महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा एक नवा फॉम्युर्ला पुढे आला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना महाविकास आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्ष प्रत्येकी ९० जागांवर लढणार असल्याचे स्पष्ट केले.

काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागांवर लढतील, तर उर्वरित १८ जागा मित्रपक्षांना सोडल्या जातील, असे ते म्हणाले.

आघाडीच्या नेत्यांनी बुधवारी सायंकाळी जागावाटपाचा फॉम्युर्ला जाहीर केला होता. मविआतील तिन्ही पक्ष प्रत्येकी ८५ जागांवर लढणार असल्याचे ते म्हणाले होते. पण काँग्रेस नेते काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही यावेळी सर्वच जागांवर सीईसीमध्ये शिक्कामोर्तब होईल असे सांगितले. आज आमची ५५ जागांवर चर्चा झाली. त्यात मैत्रीपूर्ण लढतींचा कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. सीईसीमध्ये शिक्कामोर्तब होईल. हा निर्णय पक्षश्रेष्ठीच घेतील, असे ते म्हणाले.

बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी दिल्लीत बोलताना हा फॉर्म्युला आता ९० वर पोहोचल्याचे सांगितले.

आमची चर्चा अजूनही सुरू आहे. आमचे उमेदवार सक्षम आहेत. त्यांच्यावरही चर्चा झाली आहे. आम्ही सीईसीपुढे ही नावे ठेवणार आहोत. पण महाविकास आघाडीत कुठेही मैत्रीपूर्ण लढत होणार नाही. ही राज्याची निवडणूक आहे. त्यामुळे काही अडचणी असतात. पण त्यावरही तोडगा काढला जात आहे, असे ते म्हणाले,

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ७ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये वांद्रे पूर्वमधून झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक यांना यंदा अनुशक्तीनगरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. सुनील तटकरे यांनी या नावांची घोषणा केली.

या यादीत झिशान सिद्दीकी - वांद्रे पूर्व, निशिकांत पाटील - इस्लामपूर, संजयकाका पाटील - तासगाव, प्रताप चिखलीकर - लोहा कंधार, सुनील टिंगरे - वडगाव शेरी, ज्ञानेश्वर कटके - शिरुर हवेली आणि सना मलिक - अनुशक्तीनगर यांचा समावेश आहे. वांद्रे पूर्वचे आमदार झिशान सिद्दीकी यांच्यासह आणखी चार नेत्यांनी आज सकाळी अजित पवार गटात प्रवेश केला.

दरम्यान, भाजपाचा विरोध डावलून अजित पवार हे नबाव मलिक यांना उमेदवारी देणार असल्याची माहिती आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नवाब मलिक मंगळवारी मुंबईतील मानखुर्द शिवाजी नगर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल करू शकतात.

## मनसेच्या उमेदवारांची चौथी यादी जाहीर

■ **मुंबई, दि. २४ :**

मनसेने संदीप हुटगी, गणेश बरबडे, अभिजित राऊत आणि रमेश गालफाडे या चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.

## कर्नाटकात १०१ दोषींना जन्मठेप

■ **वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. २४ :**

कर्नाटकच्या कोप्पल जिल्हा न्यायालयाने गुरुवारी एकाच वेळी १०१ दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही सामूहिक शिक्षा देशातील कोणत्याही जाती-संबंधित प्रकरणातील सर्वोच्च आहे.

या सर्वांना २८ ऑगस्ट २०१४ रोजी गंगावती तालुक्यातील मारकुंबी गावात झालेल्या जातीय हिंसाचारासाठी दोषी ठरवण्यात आले होते. हिंसाचाराच्या काळात ११७ लोकांनी दलितांच्या झोपड्या पेटवल्या होत्या. तथापि, १० वर्षे चाललेल्या खटल्यादरम्यान १६ दोषींचा मृत्यू झाला. न्यायमूर्ती चंद्रशेखर सी यांनी त्यांना दंडही ठोठावला आहे.

कोप्पलमध्ये दलितांना न्हावी आणि खाद्यपदार्थांच्या दुकानात जाण्यापासून रोखण्यात आलं होतं. यापूर्वी दोन जाती गटांमध्ये हाणामारी झाली होती. पुढे त्याला हिंसक वळण लागले. हिंसाचारात दलितांच्या झोपड्या जाळण्यात आल्या.

२०१४ मध्ये, राज्य दलित हक्क समितीने हिंसाचाराच्या निषेधार्थ मार्कुबी ते बेंगळुरू असा मोर्चा काढला होता. हिंसाचारानंतर तीन महिने संपूर्ण परिसर पोलिसांच्या निगराणीखाली होता. हिंसाचाराचा प्रभाव इतका मोठा होता की संपूर्ण परिसर तीन महिने पोलिसांच्या देखरेखीखाली ठेवावा लागला. याच पोलिस ठाण्याला अनेक दिवस घेराव घालण्यात आला. हिंसाचारातील सर्व आरोपी आता बल्लारी मध्यवर्ती कारागृहात आहेत.

## दहशतवादी हल्ल्यावर फारुख अब्दुल्लांचा पाकिस्तानला सज्जड दम

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २४ :**

नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुख अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरमधील गुलमर्ग येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यासाठी पाकिस्तानला जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, पाकिस्तानने हिंसाचार थांबवावा आणि भारताशी मैत्रीचा मार्ग शोधावा. आमचे भविष्य उधळण्यासाठी पाक असे करत आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला

## दोन दिवसात ३ जवान शहीद

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २४ :**

जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला येथील गुलमर्ग भागात गुरुवारी रात्री झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आणखी एक जवान शहीद झाला आहे.

नागीन भागात एलओसीजवळ दहशतवाद्यांनी लष्कराच्या वाहनावर हल्ला केला होता. यामध्ये गुरुवारीच २ सैनिक आणि २ कुली शहीद झाले. जखमी जवानाला श्रीनगरच्या ९२ बेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, मात्र शुक्रवारी सकाळी त्याचाही मृत्यू झाला.

लष्कराच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात ५० हून अधिक दहशतवादी सामील होते. उत्तर काश्मीरमधील बोटा पाथरी सेक्टरमध्ये एलओसीवरून दहशतवाद्यांनी घुसखोरी केली असावी, असा अंदाज आहे. रायफलमॅन कैसर अहमद शाह आणि रायफलमॅन जीवन सिंह अशी गुरुवारी शहीद झालेल्या जवानांची नावे आहेत.









# शाळा, मार्केट, उद्याने अशा विविध ठिकाणी मतदान करण्याविषयी जनजागृती

**नवी मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**




विधानसभा निवडणूकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत असून निवडणूक कार्यालयांच्या स्वीप पथकांप्रमाणेच महानगरपालिकेच्या विभाग कार्यालय स्तरावरील पथकांमार्फतही विविध समाज घटकांपर्यंत पोहचून 20 नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

यामध्ये आज नेरूळ विभागातील सेक्टर 25 जुईनगर येथील चिंचोली उद्यानात ज्येष्ठ नागरिक तसेच मॉर्नींग वॉकला येणा-या नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहचविण्यात आला. त्यातही विशेषत्वाने युवक व नवमतदारांपर्यंत पोहचून त्यांना मतदानाचे लोकशाहीतील महत्व विशद करीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

अशाच प्रकारे नेरूळ सेक्टर 8 येथील एल मार्केट परिसरात व्यावसायिक व ग्राहक यांच्यामध्येही मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. रामलीला मैदानात श्री ॲकेडमीमधील प्रशिक्षणार्थी युवक – युवतींमध्ये लोकशाहीच्या सबलीकरणासाठी मतदानाचे महत्व याविषयी जाणीव जागृती करण्यात आली व त्यांनी मतदानाचा अधिकार कर्तव्यभावनेने बजावण्याविषयी सूचित करण्यात आले. सेक्टर 1 शिरवणे येथील महिला मंडळात जाऊनही मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. सर्वच ठिकाणी मतदानाची प्रतिज्ञा घेण्यात आली व प्रतिज्ञेचे पालन करण्याविषयी सांगण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्व प्रसारित व्हावे व त्यांच्या माध्यमातून त्यांच्या पालक व परिचितांपर्यंत मतदान करण्याविषयीचा संदेश आणि आवाहन पोहचावे यादृष्टीने नमुंमपा शिक्षण विभागाच्या वतीने महानगरपालिकेच्या तसेच खाजगी शाळांना विविध उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आज सेक्टर 9, वाशी येथील फादर ॲग्नेल स्कुलने मतदान जागृती या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. त्याचप्रमाणे नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. 102 नेरूळ येथेही चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नमुंमपा शाळा क्र. 112 करावे यांनीही रांगोळी, पथनाट्य, वक्तृत्व आणि रॅली अशा उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमार्फत मतदानाचा संदेश प्रसारित केला. नमुंमपा सीबीएससी शाळा क्र. 94 कोपरखैरणे येथे पोस्टर मेकींग स्पर्धा तसेच नमुंमपा शाळा क्र. 81 (उर्दू) खैरणे येथे चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. नमुंमपा शाळा क्र. 108, दिघा यांनीही जनजागृतीपर रॅली काढून परिसरात मतदानाविषयी जाणीव जागृती केली.

कोपरखैरणे विभाग कार्यालयात अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित नागरिकांसह मतदानाची सामुहिक शपथ घेतली तसेच बेलापूर विभागातील सेक्टर 11 मार्केटमध्ये उपस्थित व्यावसायिक व ग्राहक तसेच वाहन दुरूस्ती दुकानांतील कामगार व वाहतुक पोलीस यांच्यासह मतदानाची सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून 150 व 151 या नमुंमपा क्षेत्रातील विधानसभा मतदारसंघाकरिता ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियुक्त स्वीप कार्यक्रमाचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# भिवंडीच्या मध्यवर्ती भागात मार्केटमध्ये आरसीसी रस्त्यावर कचरा ठेकेदाराने बनविला डम्पिंग ग्राउंड

## महानगरपालिकेच्या स्वच्छता व आरोग्य विभागाचे दुर्लक्ष



महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ५ मध्ये शिवाजीनगर मार्केट येत असून या प्रभागातील कचरा उचलण्याचा ठेका योगेश ठक्कर यांना देण्यात आला आहे.नेहमी या भागात साठविलेल्या आणि डम्पिंग केलेल्या कचऱ्याची माहिती घेऊन त्यावर कारवाई करण्यास सांगितले जाईल.तसेच या परिसरात कचरा साठवणूक डम्प करण्यास मनाई करण्यास सांगितले जाईल.

**भिवंडी महापालिका,आरोग्य अधिकारी - जयवंत सोनावणे.**

**भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागात शिवाजीनगर व ठाणगे आळीतील रहदारीच्या आरसीसी रस्त्यावर महानगरपालिकेच्या कचरा ठेकेदाराने डम्पिंग ग्राउंड बनविला असून या मार्गावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना,वाहनचालकांना आणि रस्त्यावर बसलेल्या भाजीपाला विक्रेत्यांना दिवसभर या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.त्याच बरोबर गेल्या वर्षी मनपाने लाखो रुपये खर्च करून या भागात बनविलेल्या आरसीसी रस्त्याला धोका निर्माण झाला असल्याने पालिकेचे अधिकारी ठेकेदारावर गुन्हा दाखल करणार काय ? असा प्रश्न विचारला जात आहे.केंद्र व राज्य शासनाच्या स्वच्छता अभियानाचा शहरात बोजवारा उडाला असून मनपाकडून ठेकेदारांकडून अपेक्षित काम करून घेण्यापेक्षा त्यांची नियमित बिले देऊन त्यांना पोसण्याचे काम पालिकेत सुरु असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शहरातील घंटागाडयाची घंटा अथवा स्पीकर सध्या शहरात कोठेही वाजताना दिसत नाही. अनेक ठिकाणी घंटागाडी नियमित जात नाही.तसेच अनेकदा कचरा वाहतूक करणारी वाहने कचरा झाकत नाही. तसेच ज्या ठिकाणी कचरा जमा करून उचलला जातो त्या ठिकाणी जंतुनाशके फवारणी केली जात नाही. अशा विविध कामांकडे मनपाच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे ठेकेदाराचा मनमानी कारभार सुरु आहे. परिणामी कोट्यवधी रुपये खर्च करूनही भिवंडीत सगळीकडे अस्वच्छता आहे.भिवंडी शहरातील यंत्रमाग शहरात केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेली स्वच्छता मोहीम तोकडी पडत आहे. शहरातील प्रमुख भागांसह रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. असे असतानाही सफाई कंत्राटदार नियमितपणे कचरा उचलत नाहीत. महापालिका प्रशासनाच्या अथक प्रयत्नानंतर भिवंडीतून अस्वच्छता दूर केली जात नाही. शहरात ठिकठिकाणी कचरा साचल्याने संसर्गजन्य आजार वाढले आहेत. स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांबाबत दिवसेंदिवस तक्रारी वाढत आहे. महिन्याला दोन कोटींहून अधिक खर्च होत असतानाही भिवंडी शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. कचरा साफ करणारे ठेकेदार मनमानी पद्धतीने कचरा उचलतात. रस्त्यावर आणि निवासी भागात कचरा साचतो. परिसरातील नागरिकांच्या वारंवार तक्रारी करूनही सफाई कामगार व घंटागाडी ठेकेदारांवर कोणताही परिणाम होत नाही. ठेकेदार नियमितपणे कचरा उचलत नसल्याने लोक संसर्गजन्य आजारांना बळी पडत आहेत. शहरातील विविध भागात बहुसंख्य लोक उलट्या, जुलाब, विषमज्वर, खोकला, त्वचा रोग इत्यादी संसर्गजन्य रोगांना बळी पडत आहेत.त्यामुळे भिवंडी शहरात स्वच्छता अभियानाचा बोजवारा उडाला आहे.शहरातील प्रमुख मार्ग म्हणजे धामणकर नाका, भिवंडी- कल्याणरोड, वंजारपट्टी नाका,चावींद्रा मार्ग, नदीनाका आदी भागात रस्त्याच्या कडेला कचरा साचतो. शांतीनगर, मंडई, तीन बत्ती, बाजार पेठ, अशोक नगर, गोपाळ नगर, मान सरोवर, कामतघर, नवी बस्ती. ओसवाल वाडी,फेणा पाडा, भाग्य नगर, आशीर्वाद नगर आदी रहिवासी भागात रस्त्याच्या कडेला कचरा पडलेला असून या ठिकाणी घाण व दुर्गंधीमुळे नागरिक नाक बंद करून बसलेले दिसतात.अशा स्थितीत वृद्धांची अवस्था बिकट आहे.महानगरपालिकेच्या सूत्राने सांगितलेल्या माहितीनुसार, शहरातील माजी लोकप्रतिनिधी कचरा कंत्राटदार झाले आहेत. त्यामुळे पालिकेत अधिकारी आणि त्यांची मिलीभगत आहे.

त्यामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट वृत्तीमुळे तथाकथित ठेकेदारांना कोणाचीच भीती राहिलेली नाही. महापालिकेची परिस्थिती अशी आहे की, आजी-माजी लोकप्रतिनिधींसोबतच महापालिकेच्या सेवेत कार्यरत असलेले कर्मचारीही आपल्या पत्नी, भाऊ, नातेवाइकांच्या नावाने बनावट कंपन्या उघडून त्यांच्या संगनमताने वर्कऑर्डर घेऊन त्यांच्या मनाप्रमाणे काम करतात.हे बेकायदेशीर कंत्राटदार बनून महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे खिसे गरम करीत आहेत आणि महापालिकेची सेवा बदनाम करण्यात आणि शहराची नासाडी करण्यात गुंतले आहेत. आजी-माजी लोकप्रतिनिधींशी करार करणाऱ्या मनपाच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या अधिकाराचे पूर्ण संरक्षण असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.त्यामुळे शहरात दुर्गंधी पसरलेली असताना कोणी माजी लोकप्रतिनिधी आणि राजकीय पुढारी याबाबत पाठपुरावा करताना दिसत नाही. परिणामी नागरिकांना याचा त्रास होऊन शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी धावली महाराष्ट्र कर्मचारी युनियन

**नवी मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**



परिवहन सेवेत काम करीत असताना झालेल्या अपघातात जखमी झालेल्या चालकाच्या उपचाराचा खर्च महापालिका प्रशासनाने न केल्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या उपचाराचा सर्व खर्च महाराष्ट्र कर्मचारी युनियन करणार असल्याची माहिती कामगार नेते व महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी दिली.

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमातील आसुडगाव डेपोतील चालक राजकुमार सोनकांबळे (चालक नंबर १५८६) हे बुधवारी, दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी बस क्र/एमएच ४३ बीजी ९८६२, कामगिरी क्र. ५९ नियोजित कामगिरी करत असताना ठिकाण (आदई तलाव, पनवेल ) येथे ड्रायव्हर साईटचा बसचा दरवाजा अचानक उघडला गेला. सदर चालकाने तातडीने पुढील अपघात टाळण्यासाठी वेळेत सावधगिरी बाळगून दरवाजा बंद करण्याचा प्रयत्न केला. पण या प्रयत्नामध्ये चालकाचा बाहेरच्या बाजूला तोल गेल्याने सदर चालक राजकुमार सोनकांबळे हे चालत्या बसमधून खाली पडले गेले. चालकाच्या डाव्या पायाला जबर मार लागला असून तपासणीअंती डॉक्टरांकडून तीन जागी फ्रॅक्चर सांगण्यात आले आहे. तसेच चालकाच्या पायात रॉड टाकण्यास डॉक्टरांकडून सांगण्यात आले आहे. चालक राजकुमार सोनकांबळे हे वाशी, सेक्टर १० मधील महापालिकेच्या प्रथम संदर्भ रुग्णालयात उपचार घेत आहेत.

कामगार नेते रविंद्र सावंत हे मोरोक्को येथे आयटीएफच्या जागतिक परिषदेसाठी गेले होते. नवी मुंबईतील कर्मचाऱ्यांच्या समस्या, असुविधा याला जागतिक व्यासपिठावरुन वाचा फोडल्यावर आठ दिवसांनी भारतात आले असता त्यांनी मुंबई विमानतळावरुन घरी न जाता थेट वाशीतील प्रथम रुग्णालयात धाव घेत संबंधित कर्मचाऱ्याची भेट घेतली. कर्मचाऱ्यांना मेडीक्लेम नाही, आरोग्य सुविधा नाही, उपचाराचा खर्च दिला जात नाही, उपचारासाठी गैरहजर राहिल्यास वेतनातून कपात केली जाते. वारंवार पाठपुरावा करुनही पालिका प्रशासन कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत, उपचाराबाबत उदासिनता दाखवित असल्याचा संताप व्यक्त करत महापालिकेने कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडले असल्याचा आरोप कामगार नेते रवींद्र सावंत यांनी यावेळी केला.

रुग्णालयातील डॉक्टरांची भेट घेत जखमी कर्मचाऱ्याच्या प्रकृतीबाबत व उपचाराबाबत माहिती जाणून घेतली. त्या ठिकाणहूनच परिवहन व्यवस्थापक यांना मोबाईल वर कॉल करून कामगार नेते श्री.रविंद्र सावंत यांनी डॉक्टरांशी बोलणी करून दिली. खर्चाची जबाबदारी परिवहन व्यवस्थापकांनी घेतली आहे. तथापि परिवहनने खर्च न केल्यास महाराष्ट्र कर्मचारी युनियन जखमी चालकाच्या उपचाराचा सर्व खर्च करेल, अशी माहिती कामगार नेते श्री.रविंद्र सावंत यांनी यावेळी दिली.

# 24 तारखेला आमचा मुख्यमंत्री शपथ घेईल-चंद्रकांत पाटील

**पुणे, दि. २५ : प्रतिनिधी**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चार दिवसांपूर्वी भाजपकडून ९९ जणांची यादी जाहीर केली होती.त्या यादीत पुण्यातील कोथरूड विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार आणि भाजपचे जेष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्या नावाची घोषणा होताच मतदार संघातील पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी एकच जल्लोष केला होता. त्यानंतर चंद्रकांत पाटील हे केव्हा उमेदवारी अर्ज दाखल करणार ही चर्चा सुरू असताना आज गुरुवारी चंद्रकांत पाटील हे उमेदवारी दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले.

त्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी पुणे शहराचे ग्रामदैवत मानाचा पहिला कसबा गणपतीचे दर्शन घेतले.त्यावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधला असता ते म्हणाले की,आमच्या पक्षाचे नेते देवेंद्र जी असून आमच्या पार्टीत एक शिस्त निर्माण केली आहे.देवेंद्र जी सांगतील तेव्हा ऐकायच आणि फार उत्सुकता देखील दाखवायची नाही.जेणेकरून त्यांना सांगण्याची सक्ती निर्माण होऊ नये.त्यामुळे कधी कधी लगेच सांगण हे सोयीच नसत, अशी भूमिका मांडत कसबा मतदार संघातील भाजपचा उमेदवार कोण असणार हे सांगण त्यांनी टाळले. महाविकास आघाडीकडून काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांचा मुख्यमंत्री पदासाठी चेहरा समोर येत आहे.त्या प्रश्नावर चंद्रकांत पाटील म्हणाले की,त्यांच्या पार्टीचा अंतर्गत प्रश्न आहे. पण सत्ता आली तरच मुख्यमंत्रीपदाचा विषय आहे ना, यंदा महायुतीची सत्ता येणार आहे.२३ तारखेला निकाल लागल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत पार्लमेंट्री बोर्डाची बैठक होईल.त्यामध्ये निर्णय घेऊन २४ तारखेला आमचा मुख्यमंत्री शपथ घेईल अशी भूमिका मांडत,महायुतीमधील कोणता नेता मुख्यमंत्री होणार, यावर चंद्रकांत पाटील यांनी उत्तर देणे टाळले.

# मुंबईमध्ये 3 ठिकाणी क्षेत्रस्तरीय इंग्रजी माध्यम निरंकारी समागम

## सकारात्मक पद्धतीने जीवन जगण्याचा दिला संदेश

**मुंबई, दि. २५ : प्रतिनिधी**



सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनानुसार संत निरंकारी मिशनच्या विद्यमाने संपूर्ण भारतभर इंग्रजी माध्यम निरंकारी संत समागमांची श्रृंखला आयोजित करण्यात आली असून त्या अंतर्गत मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये मागील रविवारी चेंबूर, बोरिवली आणि ऐरोली-नवी मुंबई अशा तीन ठिकाणी भव्य रूपात इंग्रजी माध्यम संत समागमांचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये मुख्यत: आध्यात्मिक ज्ञानाने युक्त होऊन सकारात्मक पद्धतीने जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला.

**शाश्वत सुखाचे आगर आहे परमात्मा**

संत निरंकारी सत्संग भवन, माहुल रोड, चेंबूर येथे आयोजित क्षेत्रस्तरिय इंग्रजी माध्यम संत समागमात मुख्य मंचावरुन आपले विचार व्यक्त करताना आदरणीय डॉ.पुरुषोत्तमजी अरोरा म्हणाले, की मनुष्य आपले जीवन भौतिक वस्तूंच्या माध्यमातून सुखमय करण्याचा प्रयत्न करत असतो. तथापि, तन-मन-धन रुपी जी साधने ईश्वराने काही काळासाठी दिलेली आहेत त्यामध्ये खरे सुख नसून या साधनांचासदुपयोग करुन जर मनुष्य ब्रह्मवेत्ता महात्माला भेटून सत्याचा बोध प्राप्त करील तर त्याच्या जीवनात शाश्वत सुख व आनंदाची प्राप्ती आपसूकच होईल. शिवाय त्याचे जीवन सार्थक गणले जाईल. कारण सत्य परमात्म्याला जाणून घेणे हाच जीवनाचा मूळ उद्देश आहे. परमात्म्याला जाणून जेव्हा आपण नित्यप्रति सत्संग, सेवा आणि नामस्मरण करु तेव्हा जीवनातील चढउतारांनी आपण विचलीत न होता सहज व सकारात्मक रीतीने जीवन जगण्याची कला प्राप्त करु शकतो.

डॉ.पुरुषोत्तमजी यांना या संत समागमाची अध्यक्षता करण्यासाठी विशेष रुपाने हुबळी (कर्नाटक) येथून बोलाविण्यात आले होते. चेंबूर येथील या संत समागमामध्ये कुलाबा ते मुलुंड व मानखुर्द पर्यंतच्या परिसरातील सुमारे 2000 हून अधिक भाविक भक्तगण उपस्थित होते.

या समागमात जवळपास 21 वक्त्यांनी इंग्रजीसह हिंदी, मराठी व पंजाबी आदि भाषांचा आधार घेऊन विचार, गीत, कविता आदि माध्यमातून संत निरंकारी मिशनच्या शिकवणूकीवर आधारित आपले भाव व्यक्त केले.

**युवावर्गाच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा द्या**

दूसरा क्षेत्रस्तरिय इंग्रजी माध्यम निरंकारी समागम याच दिवशी संत निरंकारी सत्संग भवन, गोराई ब्रिज, बोरिवली (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला ज्यामध्ये वांद्रे ते भाईंदर या पश्चिम उपनगरातील सुमारे 2000 निरंकारी भक्तगणांनी भाग घेतला.

या समागमात मुख्य विचारांसाठी मिशनच्या वतीने जबलपुर येथील आदरणीय भगिनी जागृती वाधवा यांची नियुक्ती करण्यात आली होती. मुख्य मंचावरुन बोलताना त्यांनी सांगितले, की केवळ आपला देशच नव्हे तर जगभरातील युवाशक्तीला जर सकारात्मक दिशेला वळवले गेले तर या जगाचे सुंदर भविष्य निर्माण होऊ शकेल आणि आज संत निरंकारी मिशन हेच कार्य करत आहे. सुमारे 50 वर्षांपूर्वी युवावर्गाच्या प्रतिभांना योग्य दिशा देण्याचा पाया बाबा गुरबचनसिंहजी यांनी रचना आणि त्या उद्देशाने 1975 साली निरंकारी युथ फोरमची स्थापना केली ज्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी बाबा हरदेवसिंहजी यांच्या खांद्यावर सोपवली जे कालांतराने सतगुरु रुपात प्रकट झाले.

त्या पुढे म्हणाल्या, की वर्तमान सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी याच फोरमच्या माध्यमातून देश-विदेशात जागोजागी निरंकारी युथ सिम्पोझियमचे आयोजन करुनप युवावर्गामध्ये उमंग उत्साह भरला ज्यायोगे निरंकारी युवा आज नशेसारख्या दुर्गुणांपासून दूर राहून तसेच भेदभावांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक मानवाच्या प्रति प्रेम व करुणेचा भाव बाळगून मानवतेच्या सेवेमध्ये अग्रेसर आहे.

याही समागमात सुमारे 21 वक्त्यांनी गीत, विचार, कविता आदि विविध माध्यमातून आपले भाव प्रकट केले.

**तनाव मुक्त जीवन जगण्यासाठी परमात्म्याला प्राथमिकता द्या**

जीवनात जेव्हा आपण अहंकाराचा त्याग करुन निराकार परमात्म्याला प्राथमिकता देऊ लागतो, सद्गुणांचा अंगीकार करतो, प्रेमपूर्ण व्यवहार करु लागतो, इतरांना प्राथमिकता देतो तेव्हा जीवनात आनंद नांदू लागतो. आपल्या जीवनातील, परिवारातील, नात्यांमधील जे चढउतार होते ते सर्व सहजपणे दूर होतात आणि आमच्या मनातील संभ्रम दूर होऊन शांतीसुखाचा लाभ होतो ज्यायोगे मनातील तनाव दूर होतो. सतगुरुच्या कृपेने प्राप्त होणारे ब्रह्मज्ञान जीवनात धारण केल्याने हे परिवर्तन आपसूकच घडून येते.

संत निरंकारी सत्संग भवन, साठे नगर, ऐरोली, नवी मुंबई येथे आयोजित तिसऱ्या क्षेत्रस्तरिय इंग्रजी माध्यम समागमात बंगळुरु (कर्नाटक) येथून आलेले निरंकारी प्रचारक आदरणीय श्री.विजय मिश्रा जी यांनी मुख्य मंचावरुन आपले विचार मांडताना हे प्रतिपादन केले.

या समागमात नवी मुंबई, उरण व ठाणे परिसरातून आलेल्या सुमारे 1000 निरंकारी भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. समागमाच्या दरम्यान अनेक वक्त्यांनी त्यांचे भाव इंग्रजीसह अन्य काही भाषांतून व्याख्यान, गीत, कविता इत्यादिंच्या माध्यमातून व्यक्त केले.

# दिव्यात घरफोडी करणाऱ्या सराईताला मुंब्रा पोलिसांकडून अटक




**ठाणे, दि. २५ : प्रतिनिधी**

मुंब्रा पोलिस स्टेशन अंतर्गत उप आयुक्त, परिमंडळ १, ठाणे, सहा. पोलीस आयुक्त कळवा विभाग, ठाणे, वपोनि. अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा येथील साबेगाव येथे घरफोडी करणा-या आरोपीस दिवा येथील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी वसंत खतेले व त्यांच्या टीमने गुन्ह्याचे तांत्रीक विश्लेषन करून शिताफीने अटक केली असता त्याचेकडुन घरफोडी करून चोरी कलेले १ लाख रु रोख रक्कम व २,१९०००, किमतीचे सोन्याचे दागीने असा एकूण ३ लाख १९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. सदर अटक आरोपी सुजितकुमार श्यामचंद्र प्रजापती, वय २२ वर्षे, राह. आई एकवीरा अपार्टमेंट, रूम नंबर ५१२. डी. जे. कॉम्लेक्स, साबेगाव, दिवा पुर्व ता. जि. ठाणे मुळगाव- शेखपुर, पो. कलापुर, जोनपुर राज्य उत्तरप्रदेश नमुद आरोपीत यांचेकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल व उघड करण्यात आलेले दोन गुन्ह्याची नोंद घेण्यात आली आहे. सदरची उल्लेखनिय कारवाई सुभाष बुरसे, पोलीस उप आयुक्त, उत्तम कोळेकर, सहा. पोलीस आयुक्त, कळवा यांचे मार्गदर्शनाखाली मुंब्रा पोलीस स्टेशनचे वपोनि अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय दवणे, नितीन पगार, राजु पाचोरकर, सपोनि वसंत खतेले, सहापोउनि / मोरे, पोह मुंढे, पोना.जयेश तामोरे, पोना. निलकंठ लोंढे, पोशि. उमेश गायकवाड, पोशि. महेश जाधव, पोशि. समाधान जाधव, यांनी केले असून पुढील तपास सुरु आहे.

# योगातील सूक्ष्म व्यायामांची परिणती माणसाच्या जीवनाला अधोरेखित करते : डॉ. सूर्यकांत पाटील

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :

मानवी जीवनात औषधापेक्षा योगा आणि व्यायामाला अधिक महत्व असावे. औषध ही तत्कालीन असतात, तर योग आणि व्यायाम ही माणसाच्या जीवनावर दीर्घकाळ सकारात्मक परिणाम करतात, किंबहुना योगातील सूक्ष्म व्यायामाची परिणती ही माणसाच्या जीवनाला अधोरेखीत करीत असते, असे प्रतिपादन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे माजी योगाचार्य डॉ. सूर्यकांत पाटील यांनी केले.



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए योगशास्त्र, पी. जी. डिप्लोमा इन योगथेरेपी, पी. जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स या अभ्यासक्रमांच्या संयुक्त विद्यमाने अतिथी व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून प्रादर्शिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, योग अभ्यासक्रमाकडे व्यावसायिक दृष्टीने न बघता स्वतः व समाजाचे आरोग्य कसे सुदृढ राहील, याकडे अधिक लक्ष द्यावे. सूत्रसंचालन प्रा. आदित्य पुंड, तर आभार प्रा. अश्विनी राऊत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. राधिका खडगे, प्रा. स्वप्निल मोरे, प्रा. प्रफुल्ल गंजारे, प्रा. अनघा देशमुख, प्रा. स्वप्निल ईखार, प्रा. स्वाती धनस्कर, प्रा. पुजा म्हस्के, प्रा. शिल्पा देव्हारे, प्रा.राहुल दोडके यांनी अथक परीश्रम घेतले. कार्यक्रमाला विभागातील सर्व अभ्यासक्रमांचे प्राध्यापक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थिती होते.

# जनावरे चोरी करणाऱ्या टोळीच्या म्होरक्यास पोलिसांकडून अटक

## स्थानिक गुन्हे शाखा व बिबी पोलिसांची संयुक्त कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २५ :

सततची नापिकी, डोक्यावर कर्जाचा डोंगर यासह इतर समस्यांमुळे वैफल्यग्रस्त झालेल्या एका ५५ वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली आहे. ही घटना खामगाव तालुक्यातील लोणी गुरव येथे उघडकीस आली आहे. संतोष उत्तम मोरे असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे.

खामगाव तालुक्यातील लोणी गुरव येतील शेतकरी संतोष मोरे यांच्याकडे पोटापुरती शेती आहे. या शेतीत काबाडकष्ट करून ते कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी बँकेचे कर्ज काढले होते. परंतु, शेतात पाहिजे तसे उत्पन्न होत नसल्याने ते कर्ज भरु शकत नव्हते, त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते मानसिक तणावात होते. यातून कुठलाच पर्याय न सापडल्याने त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे नातेवाइकांचे म्हणणे आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी नोंद केली असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

बुलडाणा जिल्ह्यात जनावरांची चोरी करणाऱ्या टोळीच्या म्होरक्यास पोलिसांनी मोठ्या शिताफीने संभाजी नगर येथून जेरबंद केले आहे. यावेळी किनगाव जट्टू येथून चोरलेली चार जनावरे व वाहन असा एकुण ५ लाख २५ हजार रुपयाचा मुद्देमाल



पोलीसांनी जप्त केला आहे. ही कारवाई आज २४ ऑक्टोबर रोजी करण्यात आली आहे.[ बिबी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक बोलेरो पिकअप वाहन २१ ऑक्टोबर रोजी संशयीतरित्या आढळुन आले होते.

या वाहनाचा बिबीचे ठाणेदार संदिप पाटील, सहायक पोलीस निरीक्षक परमेश्वर शिंदे, नापोका अरुण सानप, भारत ढाकणे यांनी पाठलाग केला असता ते वाहन दुसरबीड टोल नाक्यावरुन समृध्दी महामार्गावर गेल्याने त्या वाहनाचा पाठलाग छत्रपती संभाजीनगरपर्यंत करण्यात आला. सावंगी नाका भागात पिकअप वाहन पोलिसांची नजर चुकवून पसार झाले. त्यानंतर हर्सूल व फुलंब्री येथील पोलिसांची मदत घेवुन पोलीस पथकाने कसोशीने तपास करण्यास सुरूवात केली.

हर्सुल, सावंगी नाका, गणोरी भागात बोलेरो पिकअप वाहन, आरोपी व चोरुन नेलेल्या जनावरांचा शोध घेत असतांना जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचा म्होरक्या पोलिसांना मिळुन आला. यावेळी त्याच्या ताब्यातून किनगाव जट्टु येथून चोरुन नेलेले चार जनावरे हर्सूल भागातून जप्त करुन मुख्य आरोपी शेख रहिम शेख खमरुद्दीन रा हर्सूल ग्रीन पार्क सोसायटी यास अटक केली. यावेळी त्याची विचारपूस करुन २३ ऑक्टोबर रोजी पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथून जनावर चोरी करणारे आरोपी व जनावरे चोरी करण्यासाठी वापरत असलेले बोलेरो पिकअप वाहन सिडको हद्दीतून जप्त करण्यात आले.

# शिवनाळा येथे अपघातात दोन ठार

**मारेगाव :** मालवाहू पीकअप चारचाकी वाहनाची दुचाकीला जबर धडक बसून एक दुचाकीस्वार जागीच ठार झाला. तर एकाचा चंद्रपूर येथे उपचाराठी घेऊन जात असताना रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना राज्य महामार्गावरील शिवणाळा फाट्यानजीक बुधवारी २३ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजेच्या सुमारास घडली. रवींद्र रामकृष्ण अवताडे वय ३७ वर्ष रा. खडकी आणि अतुल झिंगू किनाके वय २३ वर्ष अशी मृतांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, मृत रवींद्र अवताडे यांची बुरांडा शिवारात राज्य महामार्गानजीक शिवणाळा रस्त्यावर पाच एकर शेती आहे. रविंद्र व त्याचा सहकारी अतुल दोघेही बुधवारी रात्री कपाशीला पाणी (ओलीत) देण्यासाठी दुचाकी क्रमांक एमएच- २९- डब्ल्यू -२७७९ ने जात होते. दरम्यान, करंजीकडून मारेगावकडे भरधाव जात असलेल्या (पिकअप) एमएच-२९- टी- ६६५१ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाची दुचाकीला जोरदार धडक बसून दुचाकीस्वार रवींद्र रामकृष्ण अवताडे याचा जागीच मृत्यू झाला. तर सहकारी अतुल किनाके याला गंभीर जखमी अवस्थेत मारेगांव रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# मातीच्या फॅन्सी दिव्यांना बाजारात मागणी

**अकोला :** दिवाळी खरेदीचा चांगला उत्साह बघण्यास मिळत आहे. यासाठी शहरातील बाजारपेठाही सज्ज झाल्या आहेत. दिवाळीत लायटिंगसाठी रंगबिरंगी विद्युत माळा, दिवे आदी उपकरणांचा वापर करतात, पण आजही मातीच्या दिव्याचे महत्त्व कमी नाही झाले. मात्र, मातीच्या दिव्यांना, फॅन्सी दिव्यांना ग्राहकांकडून अधिक पसंती दिली जात आहे. दरम्यान किमतीत १० ते १५ टक्केपर्यंत वाढ झाली आहे. टेराकोटा रंगाने बनलेल्या दिव्यांना रंगबिरंगी रंगासोबत विविध प्रकारच्या आकर्षक खड्यांनी सजवले आहे. दिव्यांमध्ये कमळ, हात, सूप, कंदील, चौकोनी, पान, हार्ट, स्वस्तिक, शंख, गणेश आणि फुले यांसारख्या कोरलेल्या सोनेरी रंगाचे डिझाइन आकर्षित करत आहेत. रंगीबेरंगी दिव्यांच्या किंमती २५ रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत आहे. तर साधे आणि हलके डिझाइन असलेले दिवे ३० ते १०० रुपये डझनने विकले जात आहेत.

# मित्रासोबतचा अल्पवयीन मुलीचा व्हिडिओ व्हायरल

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :

एक अल्पवयीन तरुणी तिच्या मित्रासोबत असताना चाकूच्या धाकावर तिला एका खोलीत नेण्यात आले. त्यानंतर मुलीचा तिच्या मित्रासोबत आक्षेपार्ह व्हिडिओ तयार केला. हा व्हिडिओ तयार करणारा एक अल्पवयीन तर दुसरा त्याचा २० वर्षीय मित्र आहे. या दोघांनी मुलीच्या मित्राकडून जबरीने ७०० रुपये घेतले. त्यानंतर वारंवार खंडणी मागितली. न दिल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तो व्हायरल केला. हा घटनाक्रम मार्च २०२४ मध्ये घडला. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून दत्तापूर पोलिसांनी बुधवारी (दि. २३) गुन्हा दाखल केला. या प्रकरणी एकाला अटक केली, तर अल्पवयीला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. अक्षय गायकवाड (२०, रा. दत्तापूर) याला पोलिसांनी अटक केली असून, प्रकरणाचा मुख्य सूत्रधार अल्पवयीन असल्यामुळे त्याला ताब्यात घेतले होते. धामणगाव रेल्वे तालुक्यात राहणारी एक अल्पवयीन मुलगी व तिचा मित्र हे २६ मार्च २०२४ ला एकमेकांना भेटले. त्यावेळी अल्पवयीन मुलगा व अक्षय हे दोघे त्या ठिकाणी पोहोचले. त्यावेळी अक्षय व त्याच्या अल्पवयीन सहकाऱ्याने दोघांना चाकूचा धाक दाखवून एका खोलीत नेले. तेथे दोघांचा आक्षेपार्ह स्थितीतील व्हिडिओ तयार केला. त्यानंतर मुलीच्या मित्राजवळचे ७०० रुपये जबरीने काढून घेतले. त्यानंतर वारंवार पैसे मागून दोघांनीही त्यांना ब्लॅकमेल केले. अखेर आरोपींनी काही दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलीचा तिच्या मित्रासोबतचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल केला.

# दुचाकीच्या धडकेत एकजण जागीच ठार, तीन गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २५ :

अकोला-पातूर मार्गावर लाखनवाडा फाट्याजवळ भरधाव दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत एक दुचाकीस्वार चालकाचा मृत्यू झाला तर मागे बसलेले तीन गंभीर जखमी झाले. हा अपघात गुरुवारी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास घडला.

अपघातग्रस्तांना अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात रात्री सव्वाआठच्या सुमारास आणले असता उपचारादरम्यान त्यातील एकाला मृत घोषीत करण्यात आले. दुसऱ्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील पिंप्री गवळी येथील गजानन चव्हाण व चिंचोली गनी येथील राजेश डाबेराव हे दोघे त्यांच्या दुचाकीने कापसी येथे २५ ऑक्टोबरला असलेल्या एका लग्नासाठी निंबी येथील नवरदेवाकडून नवरीला लावण्यासाठी हळद घेऊन गेले होते. परत येताना पातूर मार्गावर लाखनवाडा (सुलतानपूर) फाट्यावर गुरुवारी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास समोरुन येणाऱ्या म्हैसपूर (ता. अकोला) येथील सतीश देशमुख यांच्या दुचाकीने (क्रमांक एमएच- १४, जीव्ही- ८४५९) त्यांना जबर धडक दिली.

या अपघातात गजानन चव्हाण (वय ३५, रा. पिंप्री गवळी) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या दुचाकीचे चालक सतीश देशमुख (३०),रा. म्हैसपूर तसेच त्यांच्या मागे बसलेला मनीष वानखडे (३२),रा, म्हैसपूर व दुसऱ्या दुचाकीवरील राजेश डाबेराव (३२),रा. चिंचोली गनी हे तीन जण गंभीर जखमी झाले. देशमुख यांची प्रकृती गंभीर असून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर दोघांवर सर्वोपचार रुग्णालयात अतिदक्षता कक्षात उपचार सुरु आहेत.

बसमधून आणले रुग्णालयात

रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी नितीन सपकाळ यांना माहिती मिळताच त्यांनी रुग्णवाहिका घेऊन अपघातातील जखमींना उचलून तातडीने अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात आणले. त्यांना पादचारी आनंद सोनवणे व अकोला-पातूर बसचे चालक व वाहक यांचे सहकार्य लाभले. काही जखमींना अकोला-पातूर बसमधून रुग्णालयात आणले.

अकोला-पातूर रस्त्यावर लाखनवाडा फाट्याजवळ हा अपघात सव्वासातच्या सुमारास झाला. मात्र सुमारे अर्धा तास जखमी रक्तबंबाळ अवस्थेत पडले असतानाही या रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्या एकाही वाहन चालकाने या अपघातातील जखमींना तातडीने उचलून आपल्या वाहनाने रुग्णालयात नेण्याचे सौजन्य दाखवले नाही. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यातील काहीजण आपल्या मोबाइलमध्ये शुटींग करत होते,याबद्दल काहींनी माणुसकी हरवलेल्या या लोकांबाबत मनस्वी संताप व्यक्त केला.

# आठ वर्षीय चिमुकलीचे केले अपहरण

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :

वरुड तालुक्यातील गावात राहणाऱ्या ८ वर्षीय चिमुकलीला एका २२ वर्षीय तरुणाने मध्यरात्रीच्या सुमारास घरातून उचलून नेले.

मध्यरात्री तिच्या आईवडील व बहिणीसह ही चिमुकली झोपली होती. दरम्यान मुलगी घरात नसल्याचे लक्षात येताच आईवडिलांनी वरुड पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी तातडीने शोध मोहीम राबवून त्या मुलीचा शोध घेत अपहरणकर्त्याला बेड्या ठोकल्या. ही धक्कादायक घटना गुरुवारी (दि. २४) पहाटे साडेतीन ते ६ दरम्यान घडला आहे.

राजेश भाऊराव मरकाम (२२, रा. तरोडा, ह. मु. खानापूर) असे अटक केलेल्या अपहरणकर्त्याचे नाव आहे. आठ वर्षीय मुलगी घरात झापली होती. त्यावेळी राजेश मरकामने मध्यरात्रीच्या सुमारास मुलीच्या घरातील मागच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर तो मुलीला उचलून घेऊन गेला. दरम्यान साडेचार वाजता मुलीच्या आईला जाग आली असता मुलगी जागेवर झापेलेली दिसली नाही. त्यांनी पतीला उठवून घरात व आजूबाजूला शोध घेतला, मात्र मुलगी दिसली नाही. आईवडिलांनी तत्काळ वरुड पोलिसांना याबाबत माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वरुडचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी तातडीने तपासचक्रे फिरवून आरोपीचा शोध घेतला. त्यावेळी राजुरा ते मोरचूद मार्गावर पहाटे ६ वाजता मुलगी दिसली. तिला विचारले असता राजेश दादाने घरातून उचलून आणल्याचे सांगितले.


**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 58 - Kamthi**

**Name of the candidate : CHANDRASHEKHAR KRUSHNARAO BAWANKULE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | 1) F.I.R.No.650/2020, u/s. 187, 188, 269, 270, 291 of IPC, r/w Sec. 135 Maharashtra Police Act with Panchpawali Police Station, Nagpur.<br>2) F.I.R. No. 43/2021, u/s. 143, 188, 269, 270 of IPC, r/w Sec. 51 B DIDAS r/w Sec.3 of The Epidemic Diseases Act with Koradi Police Station, Nagpur.<br>3) F.I.R. No. 242/2021, u/s. 137 (1), (3), 188, 269, 270 of IPC, Sec. 135 Maharashtra Police Act with Sitaburdi Police Station, Nagpur.<br>4) F.I.R. No. 21/2008, u/s. 448, 143, 186, of IPC, Sec. 134, 135 Maharashtra Police Act with Kamthi Police Station, Nagpur. |
| | b. | Case no. | 1) SCC No. 21102/2021<br>2) SCC No. 8517/2021<br>3) SCC No. 11110/2023<br>4) SCC No. 900634/2008 |
| | c. | Name of the Court | 1 to 3 - C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur<br>4 - C.J.J.D. & J.M.F.C., Kamthi |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before the Hon'ble Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate Chandrashekhar Krushnarao Bawankule has been very Senior Legislator. He has been Cabinet Minister of the State of Maharashtra. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 58 - Kamthi**

**Name of the candidate : CHANDRASHEKHAR KRUSHNARAO BAWANKULE** ..................... and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# फक्त १०० रुपयांचा फॉर्म, डिपॉझिट १० हजार रुपये

**राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. इच्छुक उमेवारांनी अर्ज भरण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. सर्वच मतदारसंघांत उमेदवारी अर्ज खरेदी करण्यासाठी तोबा गर्दी झाली आहे. पण प्रत्यक्ष विधानसभेचा अर्ज कसा भरावा? तो भरताना नेमकी कोणती कागदपत्रे लागतात? डिपॉझीट किती लागते? याची इत्यंभूत माहिती इच्छुकांना असणे फार महत्त्वाचे असते.**

---------------

विधानसभा निवडणूक अर्ज भरायचा असेल तर प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मतदारसंघासाठी निवडणूक आयोगाने अर्ज उपलब्ध करून दिले आहेत. यात एकावेळी ४ फॉर्म विकत घेता येऊ शकतात. या ३९ पानांच्या अर्जामध्ये २ फॉर्म असतात. यात नमुना २ ब हा अर्ज १६ (मराठी-इंग्रजी दोन्ही मिळून) पानांचा आहे. तर दुसरा नमुना २६ हा २४ (मराठी-इंग्रजी दोन्ही मिळून) पानांचा अर्ज आहे. हे अर्ज भरताना कोणताही रकाना रिकामा न ठेवता न लागणाऱ्या रकान्यात निरंक असे लिहावे.

**नमुना २ ब मध्ये कोणती माहिती द्यायची?**

नमुना २ ब मध्ये पहिल्या पानावर राजकीय पक्षाच्या उमेदवारासाठी आणि अपक्ष उमेदवारासाठी भाग १ (राजकीय पक्ष) आणि भाग २ (अपक्ष) असे व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये उमेदवारांचा संपूर्ण नाव, पत्ता आणि कोणत्या मतदारसंघात, कोणत्या यादीत, मतदान अनुक्रमांक देखील भरावयाचा आहे. तर पक्षाने उमेदवारी दिली असेल तर एका प्रस्तावकाचा तपशील व स्वाक्षरीची गरज असते.

अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी १० प्रस्तावकांचा तपशील व स्वाक्षरी करावी लागते. आपण इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारले नाही, हे देखील त्यात नमूद करावे लागते. तर वयाची किती वर्षे पूर्ण केली, असा उल्लेख करतानाच एकावेळी दोन पेक्षा जास्त मतदारसंघातून नामनिर्देशन केलेले नाही याची शाश्वतीदेखील द्यावी लागते.

उमेदवारास आपल्यावर दाखल असलेले गुन्हे याबद्दल देखील माहिती अर्जात भरावी लागते. यात कोणत्या गुन्ह्यात जर काही शिक्षा झाली असेल, तर त्याबद्दलची माहिती उमेदवाराला द्यावी लागते. उमेदवार किंवा त्यांच्या कंपनीने सरकारसोबत काही करार केला असेल तर त्याबद्दलची माहिती देखील अर्जात नमूद करावी लागते.

**नमुना २६ मध्ये काय?**

उमेदवारी अर्ज दाखल करताना नमुना २६ मध्ये सर्वप्रथम आपल्याला एक शपथपत्र भरावे लागते. ज्यात उमेदवारांच्या संपूर्ण नाव, पत्ता, मतदारसंघाचे नाव, कोणत्या पक्षाकडून किंवा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार यासह कोणत्या मतदार यादीत आपले नाव आहे, ही माहिती सादर करावी लागते. तर संपकार्साठी उमेदवाराचा दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, समाज माध्यमांवरील खाते नमूद करावी लागतात.

उमेदवाराने आपल्या पॅनकार्डची संपूर्ण माहिती देतानाच आयकर भरले असल्यास त्यांची संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. जर पॅनकार्ड नसेल, तर तसा उल्लेख अर्जावर करावा. यात उमेदवार यांचे स्वतःसह पती-पत्नी, जर उमेदवार घरातील कर्ता असेल तर त्यांची माहिती यासह त्यांच्यावर अवलंबून असलेल्याची संपूर्ण माहिती देणे गरजेचे आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करत असताना जर फौजदारी गुन्हा दाखल असेल तर त्यासंदर्भात संपूर्ण माहिती देणे गरजेचे आहे. यात कोणत्या पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल आहे, कोणत्या न्यायालयात त्यावर सुनावणी सुरू आहे, खटला क्रमांक काय, भारतीय दंड संहितेचे कलम, अपराधाचे संक्षिप्त वर्णन, दोषारोप ठेवले आहेत की नाहीत, जर ठेवले असेल तर ते कोणत्या तारखेला ठेवले आहे, त्यावर कुठल्या न्यायालयात दाद मागितली याबद्दल निवडणूक आयोगाला माहिती देणे बंधनकारक आहे.

यात कुठल्या प्रकरणी उमेदवार दोषी ठरला असेल, तर त्यांची शिक्षा काय, कधी दोषी ठरवले ती दिनांक, अपराधाचे वर्णन, लावलेली कलमे आणि त्याविरोधात कोणत्या न्यायालयात दादा मागितली असेल, तर त्याबद्दलची माहिती निवडणूक आयोगाने दिलेल्या अर्जात भरायची आहे. जर फौजदारी खटला प्रलंबित नसेल तर नाही असे स्पष्ट करावे.

**जंगम मालमत्तेचा तपशील**

उमेदवारांना आपली जंगम मालमत्ता किती आहे, संयुक्त मालकीची मालमत्ता किती आहे ही माहिती द्यावी लागते. ठेवी, गुंतवणूक,रक्कम ठेव ठेवल्यांची तारीख, योजना, बँकेचे नाव, शाखा यांचा संपूर्ण तपशील हा अर्जात भरावा लागतो. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे बाजारमूल्य आणि शेअर्सची किंमत याबद्दल माहिती द्यावी.




उमेदवारांवर निर्वाहासाठी अवलंबून आहेत, त्यांच्याही जंगम मालमत्ताची यादी निवडणूक आयोगाला सादर करावी लागते. यात उमेदवारासह त्यांच्यावर अवलंबून असलेल्या नात्यामधील व्यक्तीची गुंतवणूक, वाहने, दागिने यांच्या खरेदीची तारीख, नोंदणी क्रमांकासह त्यांच्यावर असलेली कर्ज, ही माहिती निवडणूक अर्जात भरावी लागते.

उमेदवारांना जंगम मालमत्तेसारखीच आपल्या व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीच्या नावे असलेल्या निवासी इमारत, शेती,कमर्शियल आणि इतर स्थावर मालमत्तेचा तपशील निवडणूक आयोगाला देण्यात यावा लागतो. यात शेतजमीन कुठे आहे, त्यांचे क्षेत्र किती, त्यांचा भूमापन क्रमांक आणि क्षेत्र हे वारसाप्राप्त आहे की, कसे? हे सांगावे लागते.

स्वतः विकत घेतलेल्या जमिनीबद्दल ती कधी खरेदी केली, तेव्हा जमिनीची असलेली किंमत, जमिनीवर केलेली गुंतवणूक याची बाजरभावानुसार किंमत द्यावी लागते.यासह शेती नसलेली जमिनीवरील गुंतवणूक, त्यांचा भूमापन क्रमांक चौरस फुटामध्ये द्यावा लागतो. ही जमीन वारसाप्राप्त आहे की, कसे? हे सांगावे लागते. यासह कमर्शियल काही इमारत असेल तर त्यांचीही संपूर्ण माहिती देणे गरजेचे आहे.

**कर्जाची माहिती**

उमेदवारी अर्ज दाखल करत असताना त्यांना स्वतःसह त्यांच्यावर अवलंबित व्यक्ती अन् पती-पत्नी यांच्यावर कोणत्या बँकेचे किती कर्ज आहे, कर्जाचे स्वरुप, बँकेचे नाव, कर्जाची रक्कम, यासह कुणाकडून हात उसणे पैसे घेतले असतील त्यांचा उल्लेख अर्जात करावा लागेल.

**घरपट्टीसह हे कर भरलेत का?**

निवासस्थानाचे भाडे, विद्युत आकार, पाणीपट्टी, निवडणुकीचा अर्ज दाखल करेपर्यंतचा या सर्वांचा कर भरलेला असावा लागतो. या संबंधित संस्थाकडून ना देय प्रमाणपत्र सादर करावे लागेल. यासह इतर कोणती देयके असतील, तर त्यांचा तपशील अर्जात सादर करावा लागतो.

उमेदवाराला स्वतःसह पत्नीच्या नोकरीच्या आणि उत्पनाच्या स्त्रोताची माहिती देणे गरजेचे आहे. यासह उमेदवाराला त्याने आणि त्याच्या पत्नीने किंवा त्यांच्या संस्थेने ज्यात उमेदवार भागीदार असेल असे कंपनीसोबत केलेले करार, याबद्दल माहिती देत शैक्षणिक माहिती देखील अर्जामध्ये नमूद करावी लागते. यानंतर नमुना 26 मधील भाग अ च्या 1 ते 10 मधील तपशील भाग ब मध्ये देत एक शपथ पत्र सादर निवडणूक आयोगाला सादर करावे लागते.

**फॉर्म बी म्हणजे काय?**

मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्याला जो फॉर्म (पत्र) दिला जातो, त्याला फॉर्म बी म्हणतात. या फॉर्ममध्ये उमेदवाराला पक्षाचे अधिकृत चिन्ह दिले जावे, असे म्हटलेले असते. प्रथम प्राधान्य असलेल्यास छाननीत नाकारले गेले, तर चिन्ह आणि उमेदवारी वाटपासाठी पर्यायी नावही याच फॉर्ममध्ये असते. उमेदवार आमच्या पक्षाचा सदस्य असल्याचे म्हटलेले असते.

**फॉर्म ए म्हणजे काय?**

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पक्षाच्या उमेदवाराचे नाव ए फॉर्मद्वारे सांगितले जाते. हा फॉर्म राजकीय पक्षाच्या अध्यक्ष किंवा सचिवाकडून दिला जातो. त्यावर पक्षाध्यक्ष, सचिवाची सही, पक्षाचा शिक्का आवश्यक आहे. फॉर्मवर पक्षाने तिकीट वाटपासाठी अधिकृत केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरीही आवश्यक असते. फॉर्म एमध्ये उमेदवाराचे नाव, त्यांचे पक्षातील पद व चिन्ह यांची माहिती असते. लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकीत पक्षाने उमेदवारी जाहीर केली तरी एबी फॉर्म दिल्याशिवाय ती निश्चित होत नाही.

अर्ज भरताना चुका टाळाव्या,

अनेकजण अपुरी माहिती देतात. ही सहसा सहज घडणारी चूक. उमेदवाराने व अर्ज भरणाऱ्यांनी काळजी घेत संपूर्ण माहिती भरली पाहिजे. विशेष करून आर्थिक व गुन्हे संदर्भात. अधर्वट महितीच्या आधारे अर्ज बाद केला जाऊ शकतो.

फॉर्मवर झालेली चूक व्हाइटनर लावून दुरुस्त करता येते का?

शक्यतो व्हाइटनरचा वापर टाळावा.

फॉर्म कितीही वेळा भरता येतो, पण सोबतच शुल्क देखील भरावे लागते.

एक व्यक्ती कितीही वेळा अर्ज घेऊन भरू शकतो, पण त्याला सोबतच शुल्क देखील भरावे लागते.

एक व्यक्ती दोन मतदारसंघातून निवडणूक अर्ज दाखल करू शकतो.

गुन्ह्यांची संपूर्ण माहिती अर्जात नमूद करावी लागते, गुन्हा नोंद नसेल तर निरंक असा उल्लेख करावा.

•••••••

# उठा उठा.. मतदानाची वेळ जवळ आली!

निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्याने सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला जोमाने कामाला लागले आहेत.लोकशाहीची निवडणूक ही व्यापारी,उद्योजक लोकांनी आपल्या हाती घेतली आहे. ते निवडणुकीचे सर्व सुत्र हालवीत असतात. जनतेला कठपुतली बाहुले बनविले गेले आहे. ती फक्त मतदानापुरती सिमीत राहिलेली आहे.

निवडणुकीतील आरक्षणाचा मुद्दा जरांगे पाटीलांनी कळीचा मुद्दा केलेला आहे.याभवती निवडणुक ही फिरवली जात आहे. जेणेकरून जनतेसाठी बाकीचे मुद्दे गौण ठरविले जात आहेत. जनतेला खरे तर शास्वत विकासाची गरज आहे. सर्वांसाठी शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था मोफत करून रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात आले तर आरक्षणाची गरजच कुणाला भासणार नाही. याकडे कुणीही लक्ष वेधण्यास तयार नाहीत. जो तो फक्त आणि फक्त आपल्या समाजाचा विचार करून जातीवर आधारित राजकारणाला हवा दिली जात आहे.हे अत्यंत चुकीचे पाऊल उचलले जात आहे.

यामुळे लोकशाही प्रक्रिया बदनाम होत आहे.यामुळे जनतेची आणि देशाची प्रगती ही कुंठीत झाली आहे.सत्तेसाठी क्षणीक लाभाच्या योजना (लाडकी बहीण इ.) लागू केल्या जात आहेत.याचा भार सरकारी तिजोरीवर मोठ्या प्रमाणात पडतो आहे. देशाच्या विकासाचा विशाल दृष्टिकोन आज आपल्याकडे राहिलेला नाही.

देशातील संपुर्ण जनतेच्या विकासाचा विचारच केला जात नाही.तर गटागटातील लोकांच्या विकासाचा विचार करून जनतेतील मतांची विभागणी केली जात आहे. जातीच्या नावाने विकासाची महामंडळे वाटली जात आहेत. यामुळे जाती व्यवस्थेचे अजून बळकटीकरण केले जात आहे. याची जाणीव खरे तर जनतेला,सुशिक्षित मतदारांना असायला हवी आहे. परंतु ती आपल्याच मस्तीत जगत आहे. तिला आपला समाज, आपली मते कशी सुरक्षित राहतील

याचीच चिंता जास्त सतावते आहे. यामुळे संपुर्ण देशातील जनतेचे हित ही दुय्यम बाब ठरते आहे. आरक्षणामुळे जाती व्यवस्था ही एवढी बळकट होईल अशी अपेक्षा कधी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही केलेली नसेल. ती आज प्रत्यक्षपणे पहायला मिळते आहे. याचे दुरगामी परिणाम देशाच्या प्रगतीसाठी बाधक ठरणार आहेत. जाती जातील तेढ यामुळे वाढणार आहे. समाजातील एकजिनसीपणाला यामुळे बाधा निर्माण होणार आहे. याचा विचार करण्याची गरज देशातील प्रमुख पक्षांना वाटू नये याची खंत वाटते आहे. संपुर्ण देशातील समाज धुरीण यापासून दूर राहू इच्छितात याचे नवल वाटते. याचे गंभीर परिणाम देशाला भोगावे लागणार आहेत.

आज देशातील शिक्षण व्यवस्थेचे, आरोग्य व्यवस्थेचे बाजारीकरण झाले आहे. सरकारी नौकरीचे कंत्राटीकरण झाले आहे. यामुळे नविन पिढीचे जगणे हे असुरक्षित असणार आहेत. शेतीत, नौकरीत, व्यवसायात, उद्योग धंद्यात आर्थिक स्थिरता प्राप्त होत नसल्याने सर्व स्तरातील समाजाची वाटचाल ही अस्थिरतेकडे असणार आहे.

जशी दिवाळी जवळ आली तशी निवडणुकांची रणधुमाळी पणं सुरू झालेली आहे.कोण कुणाला फटाके बांधणार आहेत हे लवकरच कळेल.आपली निवडणूक ही नॉनइश्यू भोवती फिरते आहे. जनतेच्या प्रश्नांशी, समस्यांशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही. राज्य पातळीवर नको ते मुद्दे उचलून जनतेचे लक्ष मुळ समस्यांपासून भरकटवले जात आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, न्याय व्यवस्थेवर कुणीही भाष्य करण्यास तयार नाहीत. देशातील भ्रष्टाचारावर कुणी बोलण्यास तयार नाहीत. नागरिक सुविधांवर कुणी बोलण्यास तयार नाहीत. अजूनही आंम्हाला चांगले रस्ते, पिण्यासाठी पाणी, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधा यासाठी संघर्ष करावा लागतो आहे. जनता मतदानाच्या दिवशी मत देऊन मोकळी होते. पाच वर्ष आपल्या इच्छेनुसार प्रगती होत आहे किंवा नाही हे पहात बसते. एवढेच तिच्या हाती आहे.

मतदान करणारे मतदान करीत असतात. तर मजा मारणारे मतदानाच्या सुट्टीचा उपभोग घेत असतात. अश्या मतदारांकडे निवडणूक आयोगाने स्वतः लक्ष दिले पाहिजे. यासाठीचे कठोर नियम लागू केले पाहिजेत. मतदान हे कुठूनही करता आले पाहिजे. तरच मतदानाची टक्केवारी वाढू शकते. मतदार यादीत जाणूनबुजून घातलेला घोळ यामुळे संपुष्टात येऊ शकतो. कुठलीही पूर्व सुचना न देता आज गावी उपलब्ध नाहीत म्हणून अनेकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतात. याला आळा घातला पाहिजे. सरकारच्या सर्व योजना मतदान नियमीतपणे करणाऱ्या लोकांनाच लागू असल्या पाहिजेत. जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी वेगवेगळे प्रयोग केले गेले पाहिजेत. फक्त ईव्हीएम वर अवलंबून राहता कामा नये.

मतदारांसाठी बसण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली पाहिजे. भर उन्हातान्हात मतदान हे करावे लागते आहे.यामुळे मतदारांना भोवळ येऊ शकते. याची काळजी मतदान अधिकारी आणि बुथ वरील प्रतिनिधींनी घेतली पाहिजे. अमेरिकेत टपाल, मेल व्दारे ॲडव्हास मतदान करता येते. भारतात सुध्दा ८० वर्षाच्या वयोवृध्दांना घरून मतदान करण्याची सोय सरकारने उपलब्ध करून दिली आहे. तसेच जम्मू काश्मिर मधील विस्थापित पंडीतांना दिल्लीतून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली गेली होती असे समजते.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी असे प्रयत्न करणे गरजेचे झाले आहे. जसजशी मतदानाची वेळ जवळ येईल तसा तसा प्रचाराला आपल्याकडे वेग येत असतो. हे सर्व टाळायचे असेल तर मतदारांना आधीच सतर्क करून त्यांना आगावू मतदान करण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. मतदारानों आता तरी जागे व्हा आणि आपले मत अवश्य नोंदवा. कारण ही संधी परत ५ वर्षे उपलब्ध होणार नाही, याची जाण असू द्या.

**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ते, राजुरा.**
**9511215200**

•••••••••

# कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक

**आंतरराष्ट्रीय कलाकार दिन- इंटरनॅशनल आर्टिस्ट डे दरवर्षी २५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते. कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते.**

------------------

या दिवशी, कलाविश्वातील विविध उपक्रम राबवले जातात, जसे की कला प्रदर्शनं, कार्यशाळा आणि चर्चासत्रं, ज्यामध्ये नवोदित आणि अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळते. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव असून, त्यांच्या कायार्चा सन्मान करण्यासाठी आणि समाजातील कलात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो.

कलाकार म्हणजे कला निर्माण करणे, कलेचा सराव करणे किंवा कला प्रदर्शित करणे याशी संबंधित क्रियाकलापात गुंतलेली व्यक्ती होय. सर्वात सामान्य वापर- रोजच्या भाषणात आणि शैक्षणिक प्रवचनात फक्त व्हिज्युअल आर्ट्समधील अभ्यासकाला संदर्भित करतो. सेंट जस्टिनियन, वेल्स, सन २०२१ मध्ये कामावर असलेला चित्रकार

तथापि, हा शब्द मनोरंजन व्यवसायात देखील वापरला जातो, विशेषतः व्यावसायिक संदर्भात, संगीतकार आणि इतर कलाकारांसाठी जरी कमी वेळा अभिनेत्यांसाठी योजला जातो. आर्टिस्ट, फ्रेंच हा या संदर्भात इंग्रजीमध्ये वापरला जाणारा एक प्रकार आहे, परंतु, हा वापर दुर्मिळ झाला आहे. लेखकांचे वर्णन करण्यासाठी कलाकार या शब्दाचा वापर वैध आहे, परंतु सामान्य आहे आणि मुख्यतः समीक्षकांच्या पुनरावलोकनांसारख्या संदर्भांपुरता मर्यादित आहे; त्याऐवजी लेखक वापरला जातो.




आंतरराष्ट्रीय कलाकार दिन २५ ऑक्टोबर रोजी कलाकारांचा आणि त्यांनी केलेल्या सर्व योगदानांचा सन्मान केला जातो. २५ ऑक्टोबर १८८१ रोजी जन्मलेल्या पाब्लो पिकासो या सर्वात प्रसिद्ध कलाकारांपैकी एक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. कलाकार आपली कला निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घेतात. ते आपल्या सभोवतालच्या जगाला सौंदर्य जोडतात.

बहुतेक कलाकार अनेक वेगवेगळ्या माध्यमांसह काम करतात. इतकेच नाही तर कलाकार या शब्दात चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार, संगीतकार, नर्तक, लेखक, अभिनेते, डिजिटल कलाकार आणि बरेच काही समाविष्ट आहे. जेव्हा एखादी सर्जनशील भेट घेऊन जन्माला येते, तेव्हा ती सर्जनशीलता विविध क्षेत्रांमध्ये वाहते. उदाहरणार्थ, पिकासो एक चित्रकार, शिल्पकार, सिरेमिकिस्ट, कवी आणि नाटककार होता. लिखित कामांच्या खूप आधी कला आली. काळाच्या सुरुवातीपासून कलेने कल्पनांचा संवाद साधला आहे आणि महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी ठेवल्या आहेत. कला भूतकाळाशी जोडणी देते.

कलाकार आपला इतिहास अमिटपणे नोंदवतात. ते सत्यही शोधून काढतात. त्यांच्या कार्याद्वारे ते कथा सांगतात आणि परंपरा पार पाडतात. कलाकारांकडे त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी जोडण्याचा एक अनोखा मार्ग असतो. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात, आशेचा संदेश देणे ही त्यांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

जागतिक कला दिवस १५ एप्रिल रोजी साजरा करतात, तर आंतरराष्ट्रीय कलाकार दिन कसा साजरा करायचा- जगभरातील अनेक संस्था आंतरराष्ट्रीय कलाकार दिनाचे समर्थन करतात. यापैकी काहींमध्ये मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, आर्ट गॅलरी ऑफ ओंटारियो, नॅशनल गॅलरी ऑफ स्कॉटलंड, जेरुसलेम फाउंडेशन आणि इतर अनेकांचा समावेश आहे.

स्थानिक कलाकारांना साजरे करण्यासाठी, व्हाईट रॉक, ब्रिटिश कोलंबिया आणि सॅन मिगुएल, स्पेन सारखी अनेक शहरे ललित कला महोत्सव आयोजित करतात.

जगभरातील गॅलरी ओपन हाऊस होस्ट करतात आणि लोकांना त्यांची कला विनामूल्य किंवा सवलतीच्या दरात पाहण्यासाठी आमंत्रित करतात. आंतरराष्ट्रीय कलाकार दिनात आपण सहभागी होऊ ईच्छिता तर आपण कोणत्या प्रकारचे कलाकार आहात हे ठरवण्यासाठी ऑनलाइन क्विझ करावे.

उपाशी असलेल्या कलाकाराला जेवणासाठी बाहेर काढावे. आपल्या घरासाठी नवीन पेंटिंग खरेदी करावी,आर्ट गॅलरीला भेट द्यावी. सिम्फनीमध्ये सहभागी व्हा. कला वर्गांसाठी साइन अप करा. ते पुस्तक लिहायला सुरुवात करा. वाद्य कसे वाजवायचे ते शिका. प्रतिभा शो स्पर्धा प्रविष्ट करा.

आपल्या स्थानिक कलाकारांना सपोर्ट करा. सर्जनशीलतेची देणगी असलेल्या मुलाला प्रोत्साहित करा. एक स्क्रॅपबुक एकत्र ठेवा. सर्जनशीलता आपल्या आजूबाजूला आहे, याचा अर्थ असा आहे की आपण प्रत्येक दिवस साजरा करू शकतो. फक्त आपल्या फोनने फोटो काढणेही एक कला आहे. आपण साजरा करण्यासाठी काहीही करत असलात तरी, International Artists Day सह हा दिवस सोशल मीडियावर शेअर करा.

**आंतरराष्ट्रीय कलाकार दिवसाचा इतिहासः**

कॅनेडियन कलाकार, ख्रिस मॅक्क्लूर यांनी सन २००४मध्ये आंतरराष्ट्रीय कलाकार दिन सुरू केला. तेव्हापासून २५ ऑक्टोबर हा दिवस कलाकारांनी समाजासाठी दिलेल्या सर्व योगदानांचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित आहे.

•••••••

## दिवाळीत अभ्यंग स्नानाचे महत्व

**वाचक लिहितात**

दिवाळी या सणांमध्ये अभ्यंग स्नानाला भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व दिले आहे .अभ्यंग स्नान ब्रह्म मुहूर्तावर म्हणजे सूर्योदयापूर्वी पहाटे फलदायी ठरते. नरक चतुर्दशीच्या दिवशी अभ्यंग स्नान करण्याची पद्धत प्रचलित आहे. स्नानापूर्वी औक्षण केले जाते, त्यानंतर अंगाला तिळाचे तेल कोमट करून लावावे, नंतर सुगंधित उटणे लावून उन (गरम) पाण्याने स्नान करावे. या दिवसात थंडी पडू लागल्यामुळे त्वचा कोरडी होऊ लागते. म्हणून शरीराची कांती तजेलदार आणि मऊ व्हावी, स्नायू बलवान आणि पुष्ठ व्हावेत, तसेच हाडाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असलेले तिळाचे तेल वापरतात.

या काळात वातावरणातील थंडीमुळे आपल्या शरीरातील वात वाढतो. अशावेळी अभ्यंग स्नान केल्याने शरीरातील रक्त प्रवाह सुरळीत होऊन वाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे आपले त्रास कमी होतात. नेहमीच्या स्नानाने आपल्या शरीरातील वाढलेली सात्विकता तीन ते चार तास टिकते तर अभ्यंग स्नान केल्याने ती जास्त वेळ राहून सभोवतालचे वातावरण शुद्ध होण्यास मदत होते. त्यामुळे मन पवित्र होते, ध्यान शक्तीमध्ये वृद्धी होते, शरीरात विशिष्ट ऊर्जा निर्माण होते. आयुर्वेदात तीन संहिता आहेत पहिली म्हणजे चरक संहिता, दुसरी म्हणजे सुश्रुत संहिता ,आणि तिसरी अष्टांगदृश्य संहिता. अष्टांग संहितांमध्ये सांगितल्याप्रमाणे मल, कंडू, स्वेद, तंद्रा आणि तहान शरीराची आग शांत होऊन कांती वाढते.

पौराणिक कथा नुसार नरकासुर नावाचा एक बलाढ्य राजा उन्मत्त झाला आणि त्याने सर्वत्र उच्छाद मांडला.

तेव्हा इंद्राने नरकासुरापासून सुटकेसाठी भगवान श्रीकृष्णाची प्रार्थना केली. कृष्णाने नरकासुराचा वध केला. वध करतेवेळी नरकासुराला पश्चाताप झाला आणि त्याने कृष्णाकडे वर मागितला की, आजच्या दिवशी म्हणजे अश्विन कृष्ण चतुर्दशी या दिवशी जो अभ्यंग स्नान करेल त्याला नरक यातना होऊ नयेत. भगवान श्रीकृष्णाने ते मान्य केले. आणि या दिवशी अभ्यंग स्नान करण्याची परंपरा सुरू झाली. हा दिवाळीचा सण उत्साहाने साजरा करून श्रीकृष्णाच्या चरणी चांगल्या विचारांची शक्ती निर्माण होण्यासाठी प्रार्थना करूया.

■ **सौ. पल्लवी देशपांडे**
**दुर्ग (छत्तीसगढ)**

# फायलेरियाचा धोका टाळता येवू शकतो...

**उत्तरार्ध**



लिम्फॅटिक प्रणाली रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. या प्रणालीच्या बिघाडामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ लागते. ऊती पाण्याने भरू लागतात. यामुळे, संसर्ग आणि ॲलर्जीचा धोका वाढतो आणि संक्रमित अवयवांमध्ये सूज वाढल्याने त्यांचा आकार वाढू लागतो.

**फायलेरियासिसची लक्षणे काय आहेत?**

फायलेरियासिसच्या बहुतेक प्रकरणांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. याचा अर्थ बहुतेक लोक लक्षणे नसलेले असतात. याची लागण झालेल्या काही लोकांमध्ये सौम्य लक्षणे दिसतात, तर प्रत्येक 3 पैकी 1 व्यक्तीमध्ये गंभीर लक्षणे दिसतात. यामध्ये हात, पाय किंवा चेहरा इतका जड होतो की तो अपंगत्वाचे रूप घेतो.

रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्रांनुसार, फायलेरियासिस अनेक अवयवांना प्रभावित करते. याचा वाईट परिणाम किडनीवर होतो. याशिवाय हात, पाय आणि त्वचेवरही परिणाम होतो. आपल्या रोगप्रतिकारक शक्तीवरही याचा परिणाम होतो. फायलेरियासिसचे मुख्य कारण म्हणजे परजीवी. हे हळूहळू आपल्या लसीका प्रणालीचे नुकसान करतात. प्रथम ते अंतर्गत अवयवांवर परिणाम करते. त्यामुळे सुरुवातीला काहीच कळत नाही. जेव्हा संसर्ग खूप वाढतो तेव्हा त्याचे परिणाम शरीराच्या बाह्य अवयवांवरही दिसू लागतात.

या आजारातील सर्वात मोठी गुंतागुंत म्हणजे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. शरीर किरकोळ ॲलर्जी आणि बॅक्टेरियाच्या संसगार्शी लढण्यास असमर्थ होते. प्रत्येक लहान-मोठ्या आजाराचा परिणाम तुमच्यावर होऊ लागतो. याशिवाय ऊतकांमध्ये द्रव साचल्यामुळे होणारी जळजळ ही देखील मोठी समस्या आहे.

फायलेरियासिस हा परजीवी जंतांमुळे होतो. हे कृमी रक्तप्रवाहाद्वारे लसीका प्रणालीमध्ये खूप हळू पोहोचतात. तेथे एक प्रौढ परोपजीवी किडा ७ वर्षे जगतो. या काळात लाखो परजीवी तयार होतात. त्यांची संख्या खूप वेगाने वाढते. त्यामुळे उपचार करणे कठीण होऊन बसते.

**फायलेरियासिसचा उपचार काय आहे?**

फायलेरियासिसच्या संसर्गाच्या बाबतीत, सुरुवातीच्या दिवसांत त्याचे उपचार कमी-अधिक सोपे असतात. त्याची लक्षणे गंभीर होण्यापासून देखील टाळता येतात, परंतु जसजसा वेळ जातो तसतसे त्यावर उपचार करणे कठीण होते.

समस्या अशी आहे की सुरुवातीच्या दिवसात त्याची लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे तो आयुष्यभराचा आजार बनतो. त्याच्या उपचारात अल्बेंडाझोल, डीईसी आणि इव्हरमेक्टिन ही औषधे दिली जातात.

जर एखाद्याला फिलेरियासिस असेल तर त्याने आपल्या जीवनशैलीत काही सुधारणा केल्या पाहिजेत, जेणेकरून बॅक्टेरियाचे संक्रमण आणि ॲलर्जी टाळता येईल आणि आयुष्य सुसह्य होऊ शकेल. फायलेरियासिस टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे डास चावणे टाळणे. भारतात फिलेरियासिसचा धोका खूप जास्त असल्याने आपण विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

•••••••••

## अशोकायन

**घटस्फोटाचा महिना**

अखंड सत्ता भोगली
तरी भरलं नाही पोट
पक्षानं टीकीट नाकारलं
की घेतलाच यांनी घटस्फोट

पक्षनिष्ठा तत्व निष्ठा
भाऊ, हे सारे असत्य
सत्तेचे आम्ही भुकेले
हेच त्रिकालाबाधित सत्य ..

काडीमोड घेताच
लगेच नवीन घरठाव
गुप्त शर्तींच्या अधिन राहून
प्रेम विवाह करतात राव !



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**




# विरोधकांसाठी आमच्या लाडक्या बहिणीच पुरेशा....

# फडणवीस सहाव्यांदा मैदानात, उमेदवारी अर्ज दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :** नागपूरकरांशी मला जास्त बोलण्याची आवश्यकता नाही. कारण नागपूर शहरामध्ये आमचे काम बोलते, असे म्हणत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले. यावेळी राज्यातील भाजपचे सर्वच मोठे नेते उपस्थित होते. नागपूर येथील जनतेच्या आशीर्वादामुळेच मी राज्यासाठी काम करू शकलो, उपमुख्यमंत्री होऊ शकलो, असही फडणवीस म्हणाले.




नागपूर आणि विदर्भात परिवर्तन घडवून दाखवले असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. नागपूर शहरातील विकास पाहिला तर बदल दिसून येतो. त्यामुळे माझ्यापेक्षा माझे काम बोलते, विरोधकांबद्दल बोलायची गरज नाही. मी त्याविषयी बोलणार नाही. त्यांच्यासाठी केवळ आमच्या लाडक्या बहिणी पुरेशा आहे, असा टोला त्यांनी लगावला. असे देखील फडणवीस म्हणाले. ज्या लाडक्या बहिणींच्या तोंडाचा घास पळवण्यासाठी सुनील केदार आणि नाना पटोले यांनी नागपूरच्या न्यायालयात केस केली. त्या लाडक्या बहिणीच त्यांना पुरुन उरतील, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

मुलींसाठी मोफत शिक्षण असेल, शेतकऱ्यांसाठी मोफत मोफत बीज असेल, दिन, दलित, गरीब, आदिवासी, शेतकरी सर्वांसाठी आम्ही केलेले काम बोलत आहे. ओबीसी समाजासाठी ४८ जीआर काढणारे महायुतीचे सरकार आहे. मात्र महाविकास आघाडीच्या सरकारचा एक तरी जीआर दाखवावा, असे आव्हान त्यांनी दिले.

फडणवीस यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याआधी नितीन गडकरी यांचं छोटेखानी भाषण झालं. देवेंद्रजींनी महाराष्ट्रात नागपूरच्या विकासाला प्राधान्य दिलं. मला सांगताना आनंद वाटतोय, आपल्याला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झालीत. त्यात काँग्रेसला ६०-६५ वर्ष राज्य करण्याची संधी मिळाली. काँग्रेस जे 60 वर्षात करु शकली नाही, ते महाराष्ट्रात आणि नागपूरमध्ये देवेंद्रजींनी करुन दाखवलं असं नितीन गडकरी म्हणाले. १० वर्षात नागपूर शहरात १ लाख कोटी रुपयापेक्षा जास्त काम झाली असून, फडणवीसांचे सहकार्य असल्याचेही गडकरी यावेळी म्हणाले.

## आदित्यला हरवण्यासाठी महायुतीचा मेगा प्लॅन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांचा वरळी मतदारसंघात पराभव करण्यासाठी महायुतीने मेगा प्लॅन आखला आहे. त्यानुसार, महायुतीने या महत्त्वाच्या मतदारसंघातून शिवसेनेचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांना मैदानात उतरवण्याची तयारी केली आहे. मनसेने येथे संदीप देशपांडे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे येथे ठाकरे, देवरा व देशपांडे यांच्यात तिरंगी सामना रंगण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आदित्य ठाकरे यांनी वरळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. पण यावेळी महायुती व मनसेने त्यांना रोखण्याची प्लॅनिंग केली आहे. त्याअंतर्गत त्यांनी मिलिंद देवरा यांना मैदानात उतरवण्याची तयारी केली आहे. मिलिंद देवरा हे दक्षिण मुंबईचे माजी खासदार आहेत. त्यांचा या ठिकाणी मोठा जनसंपर्क आहे. त्यामुळे महायुतीने त्यांना येथून मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला तर आदित्य ठाकरे यांना ही निवडणूक जड जाण्याची शक्यता आहे.

भाजपकडून शायना एनसी या महिला नेत्यालाही वरळीच्या मैदानात उतरवण्याची चर्चा सुरू आहे. यासाठी त्यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचीही साथ मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची या प्रकरणी नुकतीच राज ठाकरे यांच्याशी चर्चा झाली. त्यात यासंबंधीची संपूर्ण रणनीती ठरल्याची माहिती आहे.

दुसरीकडे, शिवसेना नेत्या शितल म्हात्रे यांनी वरळीतून आदित्य ठाकरे यांच्या परतीचा प्रवास सुरू झाल्याची खोचक टीका केली आहे. आदित्य ठाकरे यांनी वरळीचा कोणताही विकास केला नाही. त्यामुळे आता त्यांचा तेथून परतीचा प्रवास सुरू झाला आहे.

**वरळीतून मिलिंद देवरांना उतरवणार?**



लोकसभा निवडणुकीत आव्हान देणारे आज उंदरासारखे वरळीच्या बिळात जाऊन लपलेत. त्यांनी लोकसभेला फेक नरेटिव्हच्या माध्यमातून अल्पसंख्यकांची मते मिळवली. पण ठाकरे गटाने आपल्या यादीत किती अल्पसंख्यकांना उमेदवारी दिली ते पहावे लागेल. त्यांचे वापरा व फेकून द्या हे धोर आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्व उमेदवारांचे अर्ज भरल्यानंतर अर्ज भरणार आहेत. पण ठाकरे गटात आदित्य ठाकरेंनी पहिला अर्ज भरला. स्वतःला मुख्यमंत्री पदाचे दावेदार मानणारे उद्धव ठाकरे कुठून निवडणूक लढवणार आहेत? की ते नेहमीसारखे मागच्या दाराने येणार? असा सवालही म्हात्रे यांनी याप्रकरणी उपस्थित केला.

## राज्यात २६ ठिकाणी शिवसेना विरूद्ध शिवसेना

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :** सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या बहुतांश उमेदवारांच्या नावांची घोषणा झाली आहे. त्यात राज्यातील २६ मतदारसंघांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत लढत होणार आहे.

त्यात छत्रपती संभाजीनगर येथील घोषित झालेल्या ४ व घोषित होण्याची प्रतिक्षा असणाऱ्या २ मतदारसंघातही शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना रंगणार आहे.

शिवसेनेच्या फुटीनंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक असल्यामुळे त्यात दोन्ही पक्षांकडून मोठी ताकद लावली जात आहे. विदर्भातील रामटेक मतदारसंघात शिंदे गटाचे ॲड. जयस्वाल आणि ठाकरे गटाचे विशाल बरबटे यांच्यात लढत होत आहे.

**पाचोरा**
ठाकरे गट - वैशाली सूर्यवंशी
शिंदे गट - किशोर पाटील

**ओवळा माजिवाडा**
ठाकरे गट - नरेश मणेरा
शिंदे गट - प्रताप सरनाईक

**महाड**
ठाकरे गट - स्नेहल जगताप
शिंदे गट - भरत गोगावले

**राधानगरी**
ठाकरे गट - के. पी. पाटील
शिंदे गट - प्रकाश आबिटकर

**मागाठणे**
ठाकरे गट - अनंत नर
शिंदे गट - मनिषा वायकर

**कुर्ला**
ठाकरे गट - प्रविणा मोरजकर
शिंदे गट - मंगेश कुडाळकर

**माहीम**
ठाकरे गट - महेश सावंत
शिंदे गट - सदा सरवणकर

**राजापूर**
ठाकरे गट - राजन साळवी
शिंदे गट - किरण सामंत

**कोपरी-पाचपाखाडी**
ठाकरे गट - केदार दिघे
शिंदे गट - एकनाथ शिंदे

**कुडाळ**
ठाकरे गट - वैभव नाईक
शिंदे गट - निलेश राणे

**सावंतवाडी**
ठाकरे गट - राजन तेली
शिंदे गट - दीपक केसरकर

**रत्नागिरी**
ठाकरे गट - सुरेंद्रनाथ माने
शिंदे गट - उदय सामंत

**दापोली**
ठाकरे गट - संजय कदम
शिंदे गट - योगेश कदम

**पाटण**
ठाकरे गट - हर्षद कदम
शिंदे गट - शंभूराज देसाई

**सांगोला**
ठाकरे गट - दीपक साळुंखे
शिंदे गट - शहाजी बापू पाटील

**परांडा**
ठाकरे गट - राहुल पाटील
शिंदे गट - तानाजी सावंत

**कर्जत**
ठाकरे गट - नितीन सावंत
शिंदे गट - महेंद्र थोरवे

**मालेगाव बाह्य**
ठाकरे गट - अद्वय हिरे
शिंदे गट - दादा भुसे

**नांदगाव**
ठाकरे गट - गणेश धात्रक
शिंदे गट - सुहास कांदे

**रामटेक**
ठाकरे गट - विशाल बरबटे
शिंदे गट - आशिष जैस्वाल

**मेहकर**
ठाकरे गट - सिद्धार्थ खरात
शिंदे गट - संजय पायमुलकर

**वैजापूर**
ठाकरे गट - दिनेश परदेशी
शिंदे गट - रणेश बोरणारे

**संभाजीनगर पश्चिम**
ठाकरे गट - राजू शिंदे
शिंदे गट - संजय शिरसाठ

**संभाजीनगर मध्य**
ठाकरे गट - किशन तनवाणी
शिंदे गट - प्रदीप जैस्वाल

**सिल्लोड**
ठाकरे गट - सुरेश बनकर
शिंदे गट - अब्दुल सत्तार

**कळमनुरी**
ठाकरे गट - डॉ. संतोष टाळफे
शिंदे गट - संतोष बांगर

पान १ वरून...

## खरीखरी

### ब्रिक्समधील भारताचेही महत्व

किंबहुना अमेरिका धार्जिणे युरोपातील अनेक देशही भारताचे मित्र आहेत. त्यामुळेच आजच्या घडीला ब्रिक्स मधील देश विकसनशील देशात मोडतात. पण या देशांची वाटचाल बघता गेल्या पाव शतकापासून आजच्या घडीपर्यंत, हे देश पाश्चात्यांच्या बरोबरीत आलेले दिसत नाहीत. त्यात भारताचाही समावेश आहे. हा समूह अमेरिका आणि युरोपीय देशाविरुद्ध असल्याचे म्हटले जात असले. तरी आपल्या पंतप्रधानांनी ही संघटना युरोपाच्या विरोधी नाही. किंबहुना, ती युरोपीय देश वगळून उभी राहिलेली संघटना आहे असे म्हटलेले आहे. रशियाच्या कझानमधील भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटना म्हणजे मोदी आणि चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांची भेट झाली आणि चर्चा झाली. याच घटनेला महत्त्वाची घटना म्हटले पाहिजे. गेल्या काही दिवसात त्यातल्या त्यात चीनचा खोडसाळपणा आणि विस्तारवाद थोडा कमी झाल्याचे भासत असले. तरी चीन भारताविरुद्ध अनेक व्यासपीठावर दिसत होता. भारत आणि चीन यांच्यात बोलणीही होत नव्हती. ती या निमित्ताने झाली. या गोष्टीला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर खूप महत्त्व आहे. भारत जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. याचा उल्लेख झाल्याशिवाय राहत नाही. भारताकडे फार मोठी बाजारपेठ आहे. भारत जगातील सर्वाधिक तरुण असलेला देश आहे. यालासुद्धा महत्त्व आहे?. अमेरिकेची मित्र संघटना नाटो यांनी काहीही म्हटले तरी, भारत आणि चीन या दोघांनाही रशियाची दोस्ती तोडता येणार नाही. हेच खरे सत्य आहे. आता या संघटनेत इतरही काही देशांचा समावेश केल्यावर काय प्रगती होते आणि त्याचा जागतिक परिप्रेक्षात किंवा वैश्विक परिपटलावर कोणता फरक पडतो. हेच भविष्यात दिसून येणार आहे. या निमित्ताने भारताचे महत्त्वही अधोरेखित झाले हे महत्त्वाचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## तीर्थक्षेत्र सोलापूर

**लोकरंग**



सोलापूर हा महाराष्ट्र राज्यातील समृद्ध इतिहास, संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे. दख्खनच्या पठारावर वसलेले, ते हातमाग आणि यंत्रमाग उद्योग, तसेच शेती आणि ऊस उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. पण याही पलीकडे सोलापूर हे एक लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे, जे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते.

**पंढरपूर :** पंढरपूर हे महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील एक शहर असून एक लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे, आणि महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचे धार्मिक स्थळ मानले जाते.पंढरपूर प्रसिद्ध विठ्ठल रुक्मिणी मंदिरासाठी ओळखले जाते, जे भगवान विष्णूचे एक रूप भगवान विठ्ठल आणि त्यांची पत्नी रुक्मिणी यांना समर्पित आहे. हे मंदिर १२व्या शतकात यादव घराण्याने बांधले होते असे मानले जाते. कोरीव काम आणि सुंदर वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे.

पंढरपूर दरवर्षी लाखो भाविकांना आकर्षित करते, विशेषतः आषाढ महिन्याच्या हिंदू महिन्यात होणाऱ्या वारी नावाच्या वार्षिक यात्रेदरम्यान. या वेळी संपूर्ण महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागातून भक्त पंढरपूरला पायी प्रवास करतात, पंढरपूरमध्ये प्रसिद्ध इस्कॉन मंदिरासह विविध हिंदू देवतांना समर्पित इतर अनेक मंदिरे देखील आहेत.

**ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य**

ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य हे महाराष्ट्र, भारतातील सोलापूर जिल्ह्यात स्थित एक संरक्षित क्षेत्र आहे. ८,६०० हेक्टर क्षेत्र व्यापलेले, अभयारण्य गंभीरपणे धोक्यात असलेल्या ग्रेट इंडियन बस्टर्डचे संरक्षण करण्यासाठी १९७९ मध्ये स्थापित केले गेले. सोलापूर हे अभयारण्याच्या सर्वात जवळचे शहर आहे आणि अभ्यागतांसाठी प्रवेशद्वार म्हणून काम करते. अभयारण्य सोलापूरपासून सुमारे ११५ किमी अंतरावर असून रस्त्याने जाता येते. अभयारण्य हे एक अद्वितीय परिसंस्था आहे जे विविध वनस्पती आणि प्राणी यांचे घर आहे. ग्रेट इंडियन बस्टर्ड व्यतिरिक्त, अभयारण्य पक्षी, सस्तन प्राणी आणि सरपटणारे प्राणी यांच्या इतर अनेक प्रजातींचे घर आहे.अभयारण्यात येणारे पर्यटक पक्षीनिरीक्षण, निसर्ग चालणे आणि वन्यजीव छायाचित्रणाचा आनंद घेऊ शकतात. भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे हिवाळ्याच्या महिन्यात जेव्हा हवामान आल्हाददायक असते आणि पक्षी जास्त सक्रिय असतात.एकूणच, सोलापूरमधील ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य हे भारतातील संवर्धन आणि जैवविविधतेसाठी एक अनोखे आणि महत्त्वाचे ठिकाण आहे. ■

## दोन अग्रवालमध्ये रंगणार सामना

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :** धनिकांचे शहर म्हणून ख्याती असलेल्या गोंदियात यावेळी विद्यमान आमदार विनोद अग्रवाल आणि माजी आमदार गोपालदास अग्रवाल या दोन अग्रवालांमध्येच सामना रंगणार आहे.



काँग्रेस, भाजपा आणि पुन्हा काँग्रेस असा राजकीय प्रवास असलेले गोपालदास अग्रवाल १२ वर्षे विधान परिषदेचे तर १५ वर्षे विधानसभेचे सदस्य राहिले. २०१९ मध्ये शेवटच्या क्षणी भाजप पक्षात प्रवेश केला आणि गोंदिया विधानसभेची तिकीट मिळवली. मात्र, भाजपचे बंडखोर अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल यांनी त्यांचा पराभव केला.

गोपाल अग्रवाल आता पुन्हा काँग्रेसमध्ये परतले असून, पक्षाने त्यांना तिकीटही दिले आहे. दुसरीकडे, गेल्यावेळी चावी चिन्हावर अपक्ष निवडून आलेले विनोद अग्रवाल आता भाजपाचे उमेदवार असून, हा सामना अटीतटीचा होणार असल्याचे दिसते. या दोघांच्या लढतीकडे विदर्भाचे लक्ष लागून राहिले आहे.

## एव्होनचा आय एम शक्ती सोहळा

**आगळ वेगळं**

दिवाळीचा सण आता अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. दिवाळीच हेच औचित्य साधून एव्होन तर्फे आय एम शक्ती हे आगळे वेगळे अभियान सुरु करण्यात आलेले आहे. दुर्गा आणि लक्ष्मीच्या दैवी सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या लक्षणीय महिलांना या अभियानाच्या माध्यमातून मानवंदना देण्यात येणार आहे.

या अभियानाच्या निमित्ताने एव्होन महिला प्रतिनिधींमधील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता, नेतृत्वगुण आणि निर्धार या गुणांचा सन्मान करण्यात येणार आहे.

आय एम शक्ती या अभियानाच्या मध्यमातून अशा महिलांच्या कथा अधोरेखित करण्यात येणार आहेत की ,ज्यांनी एव्होन ब्रॅण्डला पाठबळ तर दिलेले आहेच शिवाय आपापल्या आयुष्यात आणि समुदायात परिवर्तन देखील घडवून आणले आहे. या महिलांमधून दुर्गाचे साहस आणि लक्ष्मीची विपुलता दिसून येते,आणि यातून त्यांच्या प्रवासाचा इतरांवर घडलेला प्रभाव दिसून येतो. आय एम शक्ती या अभियानाबद्दल सविस्तर माहिती देताना एव्होन इंडियाच्या मार्केटिंग विभागाच्या महासंचालक स्निग्धा सुमन म्हणाल्या, प्रत्येक स्त्री मध्ये तिचे स्वतःचे आणि तिच्या आजूबाजूला असलेल्या लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती असते. बदल घडविण्याला प्रेरणा देणाऱ्या आणि स्वतःचे सामर्थ्य ओळखण्यास इतरांना प्रोत्साहित करणाऱ्या स्त्रियांचा या अभियानामध्ये जागर करण्यात येणार आहे. या स्त्रिया आपल्या यशोगाथांच्या कथाकारही असणार आहेत. ■



## डेटा केंद्रित माहितीच्या सुरक्षिततेसाठी सेक्लोरचे नवीन अनुपालन मानक

डेटा-केंद्रित सुरक्षा उपायांचा अग्रगण्य प्रदाता सेक्लोरने वर्धित अनुपालन नियंत्रणे आणि अहवाल क्षमता प्रदान करून जगभरातील उपक्रमांसाठी एक नवीन मानक निश्चित केले आहेत, ज्यामुळे कंपन्यांना वर्तमान आणि उदयोन्मुख सायबर सुरक्षा आणि डेटा गोपनीयता नियमांची पूर्तता करण्याची अतुलनीय क्षमता मिळते. सेक्लोर डेटा-केंद्रित सुरक्षा प्लॅटफॉर्म डेटाचे स्वतःच संरक्षण करते, त्यामुळे डेटाच्या प्रत्येक भागाला सुरक्षा, प्रमाणीकरण, दृश्यमानता आणि नियंत्रणाचा स्वतःचा वेगळा स्तर मिळतो.

संरक्षण आणि दृश्यमानतेची ही पातळी संस्थांना संवेदनशील माहिती सुरक्षित ठेवण्यास आणि जागतिक नियामक फ्रेमवर्कच्या वाढत्या संख्येचे अनुपालन करण्यास मदत करते.डेटा-केंद्रित सुरक्षा कंपन्यांना जागतिक स्तरावर त्यांच्या व्यवसायाच्या जागतिक अनुपालन मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन देते. आयआयटी बॉम्बेचे माजी विद्यार्थी विशाल गुप्ता यांनी स्थापन केलेले सेक्लोर हे संस्थांना सुरक्षा आणि अनुपालनाचे मानकीकरण आणि संघटित करण्यात मदत करते, त्यामुळे नवीन अनुपालन आवश्यकतांचे पालन करणे हे टेक्टोनिक शिफ्ट ऐवजी वाढीव बदल आहे.

सेक्लोरचे डेटा-केंद्रित सुरक्षा प्लॅटफॉर्म संस्थांना डिजिटल मालमत्तेमध्ये प्रवेश कूटबद्ध आणि व्यवस्थापित करू देते, जेणेकरून त्यांचा नियमन केलेला डेटा नेहमी संरक्षित असेल.

सेक्लोरचे प्लॅटफॉर्म संस्थांना डेटा धोरणांचे मानकीकरण आणि संघटित करण्यात मदत करण्यासाठी डिझाइन केले आहे, डेटाचे संरक्षण करतात आणि ज्ञात नियमांची पूर्तता करतात. ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## तब्बल १३८ कोटींचे सोने ताब्यात

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :** राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असतानाच आचारसंहिता सुरू असल्याने पोलिसांची ठिकठिकाणी नाकाबंदी सुरू आहे. पुण्यातील सहकारनगर परिसरात शुक्रवारी सकाळी नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी एका टेम्पोतून तब्बल १३८ कोटी रुपयांचे सोने जप्त केले.

आचारसंहिता काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात सोने पकडले गेल्यामुळे शहरात एकच खळबळ माजली. पण चौकशीअंती हे सोने बेकायदा नव्हे तर एका सोने डिलिव्हरी करणाऱ्या कंपनीचे असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी नाकेबंदीत पकडलेल्या या सोन्याची माहिती निवडणूक अधिकारी व आयकर विभागालाही दिली. त्यानंतर जप्त करण्यात आलेले सोने पुढील तपासासाठी प्राप्तिकर विभागाकडे सुपूर्द करण्यात आले. पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले की, सहकारनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी सुरु असताना, मुंबईच्या दिशेने एक पांढऱ्या रंगाचा टेम्पो पुण्यात आला होता.

पोलिस पथकाने त्याला थांबवून त्याची तपासणी केली. त्यात १३८ किलो सोने असल्याचे दिसून आले. सदर सोने हे मुंबईतील एका सोने डिलीव्हरी करणाऱ्या कंपनीचे असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. त्याबाबतची कागदोपत्री तपासणी आयकर विभाग करत आहे.

महासागर
२०२४
दिवाळी विशेषांक

■ राजकारण : डॉ. भालचंद्र कांगो, भागा वरखडे, भाष्कर खंडागळे यांचे विश्लेषण
■ आरोग्य : आरोग्यापुढचे धोके आणि वाढते अनारोग्य
डॉ. सतिश सोनवणे, डॉ. अभिजीत वैद्य, डॉ. संपत केदारे, डॉ. कुंदन गायकवाड, प्रा. शिला गाडे, डॉ. राकेश शेट्टी यांची अत्यंत उद्बोधक माहिती.
पैसा नेमका किती हवा? पैशाचे महत्व विशद करणारा परिसंवाद
■ पर्यावरण : निसर्ग सूड उगवतो काय?
डॉ. मधुकर पाचुलकर, पर्यावरण तज्ज्ञ, वैजयंती कुळकर्णी, पर्यावरण अभ्यासक, डॉ. किरण कुळकर्णी, पर्यावरण तज्ज्ञ यांची अभ्यासपूर्ण माहिती.
■ ग्राहक : ग्राहकांना सावधान करणारा श्रीराम झंवर यांचा अभ्यासपूर्ण लेख
: मधल्या पिढीच्या समस्या : मेघा ईनामदार, स्वाती पेशवे
: मराठी गझलेतील नवी वळणे : गझलकार भुषण कटककर
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी : वासुदेव कुळकर्णी यांचा वाचनीय लेख
: मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि रोजगाराचे संकट : वरिष्ठ पत्रकार मिलींद किर्ती यांचे विश्लेषण
४ वाचनीय कथा
:मुल्य: रू.१२५/-
■ भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा ■
वितरकांनी आपली मागणी आजच नोंदवावी, जेणेकरून तेवढ्या प्रती पाठविता येतील.
पुरण शुंकर ८८८८६४७७५३

# महासागर

# नागपूर वृत्तसागर

■ शनिवार, दि. २६ ऑक्टोबर २०२४ ■


## अनिल देशमुख निवडणूक लढणार नाहीत?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून काटोल मतदारसंघातून माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पण अनिल देशमुख निवडणूक लढणार की नाही? असा प्रश्न देशमुख यांच्या विधानाने उपस्थित झाला आहे. आम्ही २८ तारखेला फॉर्म भरून त्यादिवशी कोण लढणार हे स्पष्ट करू, असे अनिल देशमुख म्हणाले आहेत. ते पत्रपरिषदेत बोलत होते.

अनिल देशमुख म्हणाले, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीत काटोलची उमेदवारीही जाहीर करण्यात आली आहे. मात्र, काटोलमधून अनिल देशमुख लढवतील की, सलील देशमुख लढवतील, याबाबत आम्ही सर्व कार्यकर्ते वरिष्ठांशी बोलणार आहोत. दोघांबाबत पक्षश्रेष्ठी ठरवतील. त्यानंतर २८ तारखेला फॉर्म भरून त्यादिवशी काटोलमधून कोण लढणार हे स्पष्ट करणार असल्याचे अनिल देशमुख यांनी सांगितले.

अनिल देशमुख यांच्या आत्मचरित्रावर आधारित 'डायरी ऑफ ए होम मिनिस्टर' नावाचे एका पुस्तक येणार असून त्याविषयी बोलताना ते म्हणाले, मला खोट्या आरोपाखाली अडकवलेल्या पद्धतीचा सर्व उल्लेख पुस्तकात केला आहे.

# शक्तीप्रदर्शनासह देवेंद्र फडणवीस मैदानात

# डीएफ आर्मीच्या पोस्टरची सर्वत्र चर्चा






■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ :

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. उमदेवारी अर्ज भरण्यासाठी निघण्याआधी देवेंद्र फडणवीस यांचे घरी औक्षण करण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत त्यांचा उमेदवारी अर्ज सादर केला. नागपूर शहरासह विदर्भातील भाजपा आणि महायुतीचे अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

या शक्तीप्रदर्शनादरम्यान अनेकांचे लक्ष वेधून घेतले ते डीएफ आर्मी असा उल्लेख असलेल्या पोस्टरने . या पोस्टरवर देवेंद्र फडणवीस यांचा फोटो असून हातातील अत्याधुनिक रायफलने ते निशाणा साधताना दाखविण्यात आले आहे. एखाद्या स्टंट चित्रपटातील नायकाप्रमाणे हे पोस्टर असून, अनेक कार्यकर्ते पोस्टर धरून होते . शिवाय, बहुतेक कार्यकर्ते असेच चित्र रेखाटलेले टी शर्ट परिधान करून असल्याचे दिसले.

दरम्यान, उमेदवारी अर्ज भरल्यानंतर फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर कडाडून टीका केली . राज्यात आम्हाला विकासासाठी केवळ




७ वर्ष मिळाली. या सात वर्षात आम्ही काँग्रेस राष्ट्रवादीच्या पूर्वीच्या १५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, आज नागपूर पूर्वमधून कृष्णा खोपडे, दक्षिणमधून मोहन मते यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी शहराध्यक्ष बंटी कुकडे, आमदार प्रवीण दटके, विकास कुंभारे, माजी आ. यावेळी महापौर दयाशंकर तिवारी सरचिटणीस राम आंबोळकर, अश्विनी जिचकार, संदीप गवई, गुड्डू त्रिवेदी, विष्णू चंगेडे, विदर्भ संघटन मंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, धरमपाल मेश्राम, मंडल अध्यक्ष सेतराम सेलोकर, श्रीकांत आगलावे, विष्णू कांबळे, डॉ. आसोले, रितेश गावंडे, गणेश कानतोडे, प्रगती पाटील, बादल राऊत, सतीश सिरसवान उपस्थित होते.

### राजकीय नेत्यांना त्यांच्या मुलांच्या तिकीटाची चिंता

राज्यातील इतर नेत्यांना त्यांच्या मुलांची चिंता आहे. पण आम्हाला नागपूरच्या गरीब तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे, याची चिंता आहे, असं विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. भाजपाने त्यांच्या उमेदवार यादीत जवळपास २० नेत्यांच्या कुटुबांतील सदस्यांना उमेदवारी दिली आहे. यावरून तर गडकरींनी टोमणा लगावला नाही ना? अशा चर्चांना उधाण आले आहे.

गडकरी आज देवेंद्र फडणवीसांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपस्थित होते. तत्पूर्वी त्यांनी नागपूरमधील जनतेला सबोधित केलं. आतापर्यंत तुम्ही जो विकास बघितला, तो केवळ ट्रेलर होता. इथून पुढे तुम्हाला खरा सिनेमा बघायला मिळेल. पुन्हा नागपूरच्या जनतेने भाजपाला आशीर्वाद दिला, तर दुप्पट वेगाने विकासकामे होतील.

नागपूरमध्ये मिहान सुरु झालं. मिहानमध्ये आतापर्यंत ७८ हजार नागपूरच्या आणि विदर्भाच्या भूमीपूत्रांना रोजगार मिळाला आहे. बाकीच्या नेत्यांना त्यांच्या मुलांची चिंता आहे. पण आम्हाला नागपूरच्या गरीब तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे, याची चिंता आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा एक सक्षम नेता नागपूरने दिला आहे, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

## फडणवीसांच्या संपत्तीत ५ वर्षांत २३ टक्के वाढ

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ :



दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या शपथपत्रातील नोंदीनुसार सद्यस्थितीत त्यांच्या एकट्याच्या नावावर सुमारे सव्वा पाच कोटींची संपत्ती आहे. मागील पाच वर्षांत उपमुख्यमंत्र्यांची संपत्ती ही २३ टक्क्यांनी वाढली आहे. जमिनींच्या बाजारमूल्यात गेल्या ५ वर्षांत झालेल्या वाढीमुळे अचल संपत्तीत वाढ झाली आहे.

२०१९ साली उपमुख्यमंत्र्यांकडे वैयक्तिकरीत्या ४५ लाख ९४ हजार ६३४ रुपयांची चल संपत्ती तर ३ कोटी ७८ लाख २९ हजार रुपयांची अचल संपत्ती होती. एकूण संपत्तीचा आकडा हा ४ कोटी २४ लाख २३ हजार ६३४ इतका होता. पाच वर्षांत त्यांच्या संपत्तीत १ कोटी ८० हजार २३३ रुपयांची वाढ झाली आहे. त्यांच्याकडे सद्यस्थितीत ५६ लाख ७ हजार ८६७ रुपयांची चल, तर ४ कोटी ६८ लाख ९६ हजार रुपयांची अचल संपत्ती आहे.

**फडणवीसांनी घेतले पत्नीकडून कर्ज**

देवेद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता यांच्या नावावर २०१९ साली ४ कोटी ३८ लाख ९७ हजार ७४१ रुपयांची संपत्ती होती. ती आता वाढून ७ कोटी ९२ लाख २१ हजार ७४८ इतकी झाली आहे. त्यांच्या संपत्तीत ८०.४७ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यांच्या नावावर ६ कोटी ९६ लाख ९२ हजार ७४८ रुपयांची चल, तर ९५ लाख २९ हजारांची अचल संपत्ती आहे. फडणवीस यांनी अमृता फडणवीस यांच्याकडूनच ६२ लाखांचे कर्ज घेतल्याचे शपथपत्रात नमूद केले आहे.

**फडणवीसांवर एकही गुन्हा नाही**

फडणवीस यांनी शपथपत्रात चार प्रलंबित प्रकरणांचा उल्लेख केला आहे. त्यांच्याविरूद्ध एकही गुन्हा (एफआयआर) दाखल नाही. या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेल्या चार खाजगी तक्रारींपैकी २ तक्रारी सतीश उके यांनी केल्या असून, एक तक्रार मोहनीश जबलपुरे यांची आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत फडणवीस यांनी प्रतिज्ञापत्रात कुटुंबाकडे १० कोटी १५ लाख ७२ हजार ३७६ रुपये इतकी स्थावर व जंगम मालमत्ता दाखविली होती. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २०१९ मध्ये १७ हजार ५०० रुपये रोख तर बँकेत ८ लाख २९ हजार ६६५ रुपयांच्या ठेवी होत्या.

## खांबाला लटकलेल्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ :

हुडकेश्वर पोलीस ठाण्यांतर्गत नवीन सुभेदार ले-आऊट संकुलातील इलेक्ट्रिक डीपीवर काम करत असताना अचानक एका कर्मचाऱ्याला चक्कर येऊन बेशुद्ध पडून त्याने खांबावर गळफास घेऊन आत्महत्या केली. ज्याला अग्निशमन दलाच्या मदतीने खांबावरून खाली आणण्यात आले.

त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासणीत मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात असून, शवविच्छेदनानंतरच खुलासा होणार आहे.

हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नवीन सुभेदार ले-आऊट परिसरात शुक्रवारी दुपारी ही घटना घडली. सुनील धाबेकर (४५, रा. राजापेठ) असे मृताचे नाव आहे. एमएसईबी कंपनीने देखभालीसाठी खासगी कंपनीला कंत्राट दिले आहे. सुनील एका कंत्राटदाराकडे काम करायचा.

शुक्रवारी दुपारी सुनील त्याच्या इतर सहकाऱ्यांसह नवीन सुभेदार येथे इलेक्ट्रिक डीपीवर काम करत असताना अचानक त्याला चक्कर आल्याने तो त्याच डीपीला लटकला. एकत्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ अग्निशमन दलाला कळवले आणि त्यांच्या मदतीने बेशुद्ध अवस्थेत असलेल्या सुनीलला खांबावरून खाली उतरवून तातडीने वैद्यकीय रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तपासणीदरम्यानच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.




सुनीलचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याची भीती पोलिसांनी व्यक्त केली असून, त्याचा अहवाल आल्यानंतरच सुनीलचा मृत्यू झाला आहे. अधिक तपास हुडकेश्वर पोलीस करत आहेत.

## महावितरणचे हुडकेश्वर शाखा कार्यालय नवीन जागेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

महावितरणचे हुडकेश्वर शाखा कार्यालय पिपला ग्रामपंचायत कार्यालयाजवल स्थलांतरित्व करण्यात आले आहे, हे कार्यालय आधी दुबेनगर येथील नासरे मंगल कार्यालयाजवळ होते.

हुडकेश्वर शाखा कार्यलयांतर्गत या परिसरातील हुडकेश्वर, पिपळा, इंद्रनगर, संभाजीनगर, आम्रपालीनगर, शामनगर, साईनगर, साईविहार कडूनगर, पापूलसवाडी एनए लेआऊट आणि परिसर येतो.

या कार्यालयामार्फत्त अचूक रिडींग आणि बिलिंग, तक्रारींचे निराकरण, थकबाकी वसूली, वीज पुरवठा खंडित करणे, नवीन वीज जोडणी, सर्वेक्षण करणे, वीज पुरवठा सुरळित राखणे आणि फ्यूज कॉल-ऑफ तक्रारींचे निराकरण करणे, ऑन-साइट मीटर चाचणीसाठी संघ स्थापन करणे आदी कामे केली जात असून या भागातील ग्राहकांनी या बदलाची नोंद घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## नोकरीच्या नावावर फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ :

मर्चंट नेव्हीत नोकरी लावून देण्याची थाप मारून तिघांनी एका तरुणाची 2.45 लाख रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी हार्दिक नितीन धर्मिजवार (21) रा. शिवकृपानगर, बेसाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. इंद्रजित राठोड रा. व्यंकटेश सिटी, बेसा रोड, प्रकाश शाहू आणि नीलेश कांबळे अशी आरोपींची नावे आहेत.

हार्दिक श्रीजी शिपिंग कंपनी, गुजरात येथे कार्यरत आहे. आरोपी इंद्रजित मर्चंट नेव्हीत थर्ड ऑफिसर म्हणून काम करतो, तर प्रकाश आणि नीलेश उत्कल शिपिंग मॅनेजमेंट कंपनी, बेलापूर, मुंबई येथे कार्यरत आहेत. हार्दिक आणि इंद्रजित यांच्यात ओळख होती. हार्दिकची मर्चंट नेव्हीत काम करण्याची इच्छा होती. त्याने इंद्रजितला याबाबत माहिती मागितली. इंद्रजितने त्याला उत्कल शिपिंग कंपनीत 15 दिवसांचे प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यासाठी चार लाख रुपये खर्च येणार होता.

हार्दिकने इतके पैसे नसल्याचे सांगितले आणि विशाखापट्टनम येथे दुसऱ्या संस्थेतून दोन लाख रुपयांत प्रशिक्षण घेतले. त्यानंतर इंद्रजितने नोकरीसाठी उत्कल शिपिंग कंपनीचे प्रकाश शाहू आणि नीलेश कांबळे यांना भेटण्यास सांगितले.

24 ऑगस्ट ते 21 ऑक्टोबर 2023 पर्यंत दोघांनीही हार्दिककडून व्हीजा आणि इतर कागदपत्र तयार करण्यासाठी 2.45 लाख रुपये घेतले, मात्र नोकरी मिळाली नाही. हार्दिकने प्रकरणाची तक्रार हुडकेश्वर पोलिस ठाण्यात केली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### ३ लाखांच्या मालावर डल्ला

■ नागपूर, दि. २५ :

प्रकृती बरी नसल्याने मुलाच्या घरी जाणे एका वृद्ध महिलेला चांगलेच महागात पडले. चोरांनी घरफोडी करून रोख व दागिन्यांसह एकूण २ लाख ९२ हजार २५० रुपयांच्या मालावर डल्ला मारला.

निर्मला मधुकर भुरकुंडे (७१) रा. विठ्ठलनगर, हुडकेश्वरच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे. १९ ऑक्टोबरच्या निर्मला घराला कुलूप लावून मुलाकडे महाल येथे गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने कपाटातून सोन्याचांदीचे दागिने व रोख २० हजार रुपये असा एकूण २,९२,२५० रुपयांच्या माल चोरून नेला. बुधवार २३ ऑक्टोबरला दुपारी निर्मला घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ :

नागपूरः दिवाळीचा सन काही दिवसांवर आला असतांनाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) कर्मचा?यांना दिवाळी भेटीनिमित्त मिळणारे सानुग्रह अनुदान मिळाले नाही. त्यातच एसटीतील अधिकारी- कर्मचा?यांना वेतन ७ तारखेपूर्वी केला जात असल्याचा महामंडळाचा दावा आहे. परंतु दिवाळीनिमित्त यंदा वेतनाबाबत महत्वाची माहिती पुढे येत आहे.

दिवाळी सणाच्या पूर्वीच रेल्वे प्रशासन, राज्यातील मुंबईसह इतरही काही मोठ्या महानगर पालिका, राज्यातील अनेक खासगी कार्यालयात आपापल्या कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट किंवा बोनस स्वरूपात काही रक्कम जाहीर करते. काही ठिकाणी तर कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर देखील करण्यात आला आहे. असे असताना राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी कर्मचारी मात्र आजही दिवाळी भेट, बोनसच्या प्रतीक्षेत असल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान यंदाच्या दिवाळी बोनसमध्ये काहीअंशी वाढ करून एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपए सानुग्रह अनुदान देऊन दिवाळी भेट देण्याची घोषणा झाली होती. परंतु अद्याप काही झाले नाही. यंदा दिवाळी २८ ऑक्टोबरला आल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण एसटी कर्मचाऱ्यांचा पगार हा दरमहिन्याच्या ७ ते १० तारखेदरम्यान होतो. मात्र त्यापूर्वी येणाऱ्या दिवाळीत आर्थिक खर्च, सणांसाठीची खरेदी कशी करायची असा प्रश्न एसटी कर्मचाऱ्यांसमोर आहे. दरम्यान, एसटी कर्मचाऱ्यांच्या बोनससाठी ५५ कोटींचा निधी तातडीने द्या, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे.

शासनाने महामंडळात सवलतीमूल्याच्या प्रतिपूर्तीसाठी ३५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याबाबत अधिसूचना काढली आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी एसटीतील अधिकारी- कर्मचाऱ्यांचे वेतन होण्याचे संकेत आहेत.

> एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी शासनाकडून वेतन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोबत कर्मचाऱ्यांना बोनससाठी तातडीने शासनाने ५२ कोटींचा निधी देण्याची गरज आहे. हा निधी न मिळाल्यास आचार संहितेतही एसटी कर्मचाऱ्यांना हक्कासाठी संघर्ष करावा लागेल. ही पाळी शासनाने येऊ देऊ नये.
>
> श्रीरंग बरगे, सरचिटणीस
> महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस.

## दुग्धउत्पादन क्षमतेच्या वृध्दीसाठी टेस्ट ट्यूब बेबी

■ सुजाता बंडावार

नागपूर, दि. २५ :

दुग्धउत्पादन व दुग्धव्यवसाय म्हणजे भारतीय शेतकऱ्यांच्या शेतीला पुरक असा पारंपारिक व्यवसाय आहे. त्याच्या व्यवसाय वृद्धीबरोबर दुग्धउत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आधुनिक अशा टेस्ट ट्युब बेबी तंत्रज्ञानाद्वारे अवर्गीकृत गायींपासून केवळ एकाच पिढीत वर्गीकृत व उच्च दुग्धउत्पादन क्षमता असणारे कालवड निर्माण करण्याची प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.

भारत सरकारचे या तंत्रज्ञानावर आधारीत राष्ट्रीय गोकूळ मिशन भारतभर सुरू असून त्याच्या एकतीस केंद्रांपैकी एकोणवीस केंद्रे सुरू असून त्यापैकी विदर्भातील एकमेव महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत नागपूर पशूवैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे कार्यरत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान व कृत्रिम परिवेषीय निषेधन म्हणजेच टेस्ट ट्युब बेबी प्रयोगशाळेर्मा\त आतापर्यंत ऐंशी गायी गाभण झाल्या आहेत व अडतीस कालवड तयार झालेआहेत.

ऐंशीच्या दशकात विकसीत झालेल्या कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून शास्त्रीयदृष्ट्या कमी दुग्धउत्पादन क्षमता असणाड्या अवर्गीकृत गायींपासून वर्गीकृत आणि उच्च उत्पादन क्षमता असणाऱ्या गायी निर्माण करण्याकरीता सरासरी तीन पिढ्यांचा म्हणजेच साधारणतः साडे अकरा वर्षांचा कालावधी लागतो.

मात्र ह्या नव्या अत्याधुनिक भ्रूण प्रत्यारोपण जैवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने कमी दुग्धउत्पादन क्षमता असणाऱ्या अवर्गीकृत गायींपासून केवळ एकाच पिढीमध्ये वर्गीकृत आणि उच्च दुग्धउत्पादन क्षमता असणाऱ्या कालवडी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांच्या दुग्धव्यवसायात वृद्धी होउन गोपालकांना अधिक लाभ मिळावा यासाठी टेस्ट ट्यूब बेबी ही जैवप्रणाली अधिक

# शेतकऱ्यांसाठी ठरते आहे फलदायी



प्रभावी ठरत आहे.

या जैवतंत्रज्ञानाचा उपयोग भारतीय शेतकड्यांना मोठ्या प्रमाणात व्हावा म्हणून दूरदृष्टी लाभलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने राष्ट्रीय गोकुळ अभियान भारत सरकार ह्यांच्या आर्थिक सहकार्याने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत नागपूर पशूवैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान आणि कृत्रिम परिवेषीय निषेधन (टेस्ट ट्युब बेबी) प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली.

या प्रयोगशाळेच्या माध्यमातून दुग्ध उत्पादनाची उच्च अनुवंशिकता असलेल्या साहिवाल, गीर,गवळाउ,डांगी व देवनी ह्या देशी गोवंशाच्या गायीचे पुनुरूत्पादन केल्या जात आहे.

ह्या जैव प्रणालीत उच्च दुग्धउत्पादन क्षमता असणाड्या वगीर्कृत देशी गोवंशाच्या दाता गायीच्या गर्भाक्षयात बीजाण्डावरील बीजकोषातून स्त्री बीजे अल्ट्रासोनोग्रीच्या मदतीने एका नलिकेत शोषून घेतले जातात आणि भ्रूण प्रत्यारोपण प्रयोंगशाळेत ह्या स्त्री बीजांना एका विशिष्ट वातावरणात परिपक्व करून ह्या परिपक्व बीजाचे पुरूष बीजाद्वारे म्हणजेच शुक्राणूद्वारे मिलन केल्या जाते.

हा निर्माण झालेला भ्रूण आठ दिवस प्रयोगशाळेत विशिष्ट वातावरणात वाढवून हा भ्रूण प्रत्यारोपणासाठी तयार केल्या जातो. हा तयार झालेला भ्रूण कमी उत्पादन क्षमता असणाड्या अवगीर्कृत गायीच्या गर्भाशयात विना शस्त्रक्रिया प्रत्यारोपीत करण्यात येतो.या प्रक्रियेद्वारे गभधारणा झालेल्या गायीत गर्भधारणेचा निश्चित कालावधी पूर्ण झाल्यानंतर उच्च दुग्धक्षमता असलेल्या वगीर्कृत जातीच्या वासराचे प्रजनन होते. असे जन्मोला आलेले वासरू वयात येउन नैसर्गीक गर्भधारणेनंतर कमीत कमी पंधरा ते वीस लिटर दुग्धउत्पादन देउ शकते.

अशाप्रकारे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत नागपूर पशूवैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे स्थापीत टेस्ट ट्युब बेबी प्रयांगशाळेद्वारे नागपूर, वर्धा, गडचिरोली,अकोला हे भाग मिळून विनामूल्य ऐंशी गायी दाभण झाल्या असून अडतीस कालवडांची निर्मिती झाली आहे. ह्या प्रगत तंत्रज्ञानाद्वारे शेतकड्यांच्या दुग्ध व्यवसायाला नवी उभारी येईल यात काहीचशेका नाही. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू प्रोसर डॉ. नितीन पाटील यांच्या प्रेरणेने, डॉ. नितीन कुरकुरे, संचालक (संशोधन), डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक (शिक्षण) व अधिष्ठाता (पशु विज्ञान शाखा), डॉ. अनिल भिकाणे, संचालक (विस्तार शिक्षण) व डॉ. ए.पी.जे. सोमकुवर, सद्योगी अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प चमू डॉ. मनोज पाटील, डॉ. दिलीपसिंह रघुवंशी, डॉ. अजय गावंडे, डॉ. मिनाक्षी बावस्कर, डॉ.सोनल इंगळे, व डॉ. आशिष शेंडे हे प्रकल्पाच्या यशस्वीकरीता कार्यरत आहेत.

# नरेंद्र तिडके महाविद्यालयात मतदान जागृती अभियान

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

नागपूर जिल्ह्यातील मतदान केंद्राची मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता केंद्र व राज्य शासनाच्या वतीने 'स्वीप' अभियान उपक्रमाच्या अंतर्गत मतदार सामूहिक प्रतिज्ञा, मतदार जागृती सेल्फी बूथ आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयच्या प्रांगणात प्रा. संतोष मोहन जाधव यांनी सर्व विद्यार्थ्यांना मतदार सामूहिक प्रतिज्ञेची शपथ दिली.



प्राचार्य, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांनी मतदार जागृती सेल्फी बूथद्वारे सेल्फी घेऊन मताधिकाराचा प्रचार करण्याचा संकल्प केले. याप्रसंगी 'मतदान काळाची गरज' आणि 'मतदान श्रेष्ठ दान' या दोन विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आले. या सर्व उपक्रमाच्या प्रमुखस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालक शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. विवेक साहू यांनी केले. डॉ. मनोज तेलरांदे, डॉ. सुनील कठाणे, डॉ. दिलीप जेना, डॉ. मनोज सोनकुसरे, प्रा. अमरीश ठाकरे, प्रा. खुशबू लेंडे, प्रा.सबा शेख प्रा. आकाश मोहबिया यांनी सहकार्य केले.

# कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळणाऱ्या इसमावर कारवाई

## तीन दुचाकी वाहनासह एकुण २,११,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २५ :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा हिवरा येथे रेल्वे लाईनचे बाजुला पांधन रोडवर सुरु असलेल्या कोंबड्याचा झुंजीवर जुगार अड्यावर पोलीसांनी धाड मारुन एका इसमाला अटक करुन त्याचा जवळुन तीन दुचाकी वाहना सह २,११,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार बुधवार (दि.२३) ऑक्टोंबर ला स्थानिक गुन्हे शाखा पोलीस कन्हान उपविभागात प्रोव्हीशन जुगार रेड कामी फिरत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि मौजा हिवरा येथे रेल्वे लाईनचे बाजुला पांधन रोडवर काही इसम कोंबड्याचा झुंजीवर पैशाची बाजी लाऊन हातजीतचा जुगार खेळत आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखा पोलीस स्टाफ मौजा हिवरा रेल्वे लाईन जवळ पोहचली असता दुरुन काही इसम एकत्र होऊन कोंबड्याची झुंज खेळतांना दिसुन आले.

लपतछपत पोलीस त्यांचा कडे जात असतांना पोलीसांना पाहुण काही इसम आपले वाहन सोडुन पळु लागले. पोलीसांनी त्यांचा पाठलाग केला असता एक इसम हातात दोन प्लॉस्टीकची थैली घेऊन पळतांना दिसला. त्यास पकडुन नाव विचारले असता त्यांने आपले नाव महादेव फागुजी मारबते (वय ५५) रा.सिल्लेवाडा असे सांगितले. पोलीसांनी हातात असलेल्या दोन्ही थैलाची पाहणी केली असता दोन जिवंत कोंबडे किंमत १००० रु व एक जखमी कोंबडा किंमत २०० रु मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष अंगझडती घेतली असता झुंज लावल्याचे नगदी ५,५०० रुपए मिळुन आले असुन घटनास्थळा वर काळ्या रंगाची होंडा लियो दुचाकी वाहन क्रमांक १) एम एच ४९ सिजे ३५७८ किंमत ९०,००० रु , २) ग्रे रंगाची टिव्हीएस ज्युपीटर मोपेड क्रमांक एम एच ४९ बिक्यु ३५४८ किंमत ६५,००० रु , ३) स्प्लेंडर दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४९ एन ३८४४ किंमत ५०,००० रु मिळुन आल्याने पंचासमक्ष ई साक्ष प्रणाली द्वारे जप्त करण्यात आली.

जखमी कोंबडा आणि दोन जीवंत कोबड्यांचा लिलाव करण्यात आला असता नरसाळा गावातील मोहन डोमाजी ठाकरे(४०) रा. नरसाळा यांना १००० रु. दोन्ही कोबडे आणि एक जख्मी कोंबडा २०० रु पंचासमक्ष देण्यात आले . त्यांचे कडुन प्राप्त नगदी १२०० रु , तीन दुचाकी वाहन किंमत २,०५,००० रु , नगदी ५,५०० रु असा एकुण २,११,७०० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणा बाबत स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांनी आरोपी महादेव फागुजी मारबते यास अटक करुन त्याचा विरुद्ध कन्हान पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने पोलीसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# एस.एन.टी. महाविद्यालयातील विजेत्या कुस्तीपटूंचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

नरेंद्र तिडके महाविद्यालय रामटेक येथे दिनांक २४ ऑक्टोबरला महाविद्यालयातील विजेत्या कुस्तीपटूंचा सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला. दिनांक १८,१९ व २० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत जोतिबा फुले शारीरिक शिक्षण महाविद्यालय, हिंगणा,जि.नागपूर येथे आंतर विद्यापीठस्तरीय फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये आमच्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. विवेक साहू आणि प्रा. किशोर धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कु.कल्यानी मोहारे हीने ५७ कि. ग्रा. वजन गटात सुवर्ण पदक पटकावले. तसेच विशाल शेंडे यांनी ७४ कि. ग्रा. वजन गटात कांस्य पदक पटकावले.

त्यांचा विजय हा आम्हा सर्वांनासाठी प्रेरणा देणारा असल्यामुळे या विजेत्या विद्यार्थ्यांना भविष्यात प्रोत्साहन देण्यासाठी आमच्या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. शरद पोकळे सरांनी पुष्पगुच्छ देऊन आणि निसर्ग समिती (समन्वयक डॉ. स्वप्नील मनघे) द्वारे रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.विवेक शाहु,प्रा.किशोर धांडे, डॉ. मनोज तेलरांदे, डॉ. सुनील कठाणे, डॉ. दिलीप जेना, डॉ. मनोज सोनकुसरे डॉ. स्वप्नील मनघे प्रा. संतोष जाधव आदी उपस्थित होते.

# शिक्षिकेच्या खात्यातून उडविली रक्कम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

कुरिअरच्या पार्सलमध्ये पत्ता अपडेट करण्याची बतावणी करून सायबर गुन्हेगाराने शिक्षिकेच्या खात्यातून 1.59 लाख रुपये लांबविले. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी आमीना काहिदा जोहर हिलाल (26) रा. राज कॉम्प्लेक्स, मानकापूरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

आमीना मानकापुरातील एका शाळेत शिक्षिका आहेत. त्यांनी भोपाळ येथे राहणाऱ्या मैत्रिणीला डीटीडीसी कुरिअरने एक पार्सल पाठविले होते. 6 ऑक्टोबर रोजी अज्ञात आरोपीने त्यांना फोन केला. कुरिअर कंपनीचे नाव सांगून पार्सलवरील पत्ता चुकल्याची माहिती दिली. त्याने पत्ता अपडेट करण्यासाठी आमीना यांना एक पीडीएफ लिंक पाठविली.

त्यात त्यांच्याबद्दलची संपूर्ण माहिती भरण्यास सांगितले. अडचण आल्यास स्क्रीन शेअर करण्यास म्हटले. आमीना त्याने सांगितल्यानुसार काम करीत गेली. त्यानंतर 15 मिनिटांसाठी त्यांचा नंबर हँग झाला. काही वेळाने आरोपीने त्यांना दोन रुपये यूपीआय पेमेंट करण्यास सांगितले.

त्याच्या काही वेळातच त्यांच्या खात्यातून दोनदा ट्रांजेक्शन होऊन 85 हजार रुपये वजा झाले. आमीना यांनी आरोपीला फोन करून याबाबत माहिती दिली. त्याने चुकीने पैसे वजा झाले असल्याची माहिती देत काही वेळातच पैसे परत येतील असे सांगितले. त्यांनी एक दिवस प्रतीक्षा करूनही पैसे परत आले नाही. त्यामुळे 8 ऑक्टोबरला आमीनाने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी त्यांना बँक खाते ब्लॉक करण्याचे आश्वासन दिले. मात्र रात्री 9 वाजताच्या सुमारास पुन्हा त्यांच्या खात्यातून 3 वेळा ऑनलाईन ट्रांजेक्शनद्वारे 74 हजार रुपये वजा झाले. त्यांनी फसवणुकीची तक्रार मानकापूर पोलिसात केली. पोलिसांनी आयटी ॲक्ट आणि फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

# धारदार शस्त्र बाळगणाऱ्या दोन इसमांना पोलिसांनी पकडले

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २५ :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत बोरडा बस स्टैंड आणि आंबेडकर चौक येथे धारदार शस्त्र बाळगणाऱ्या दोन इसमांना पोलीसांनी पकडुन त्यांचा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीसांकडुन मिळालेल्या माहिती नुसार शनिवार (दि.१९) ऑक्टोंबर ला स्थानिक गुन्हे शाखा पथक कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि बोरडा बस स्टैंड जवळ एक इसम धारदार चाकु हातात घेऊन धुमाकुळ घालत आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी बोरडा बस स्टैंड जवळ पोहचुन पाहणी केली असता एक इसम संदिग्ध अवस्थेत मिळुन आला.

पोलीसांनी त्यास ताब्यात घेऊन नाव विचारले असता त्यांनी आपले नाव विशाल नामदेव चिंचोळकर (वय ३६) रा.कन्हान असे सांगितल्याने पोलीसांनी पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता कमरेत चाकु मिळुन आला. पोलीसांनी आरोपी विशाल चिंचोळकर यास अटक करुन त्याचा विरुद्ध कन्हान पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांचा मार्गदर्शनात सपोनी किशोर शेरकी, मनोज गदादे, जीवन राजगुरु, सफौ विनोद काळे, पोहवा किशोर वानखेडे, प्रमोद भोयर, नारायण राठोड, पोना संजय बदोरिया, अमित मेहर यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली

प्राप्त झालेल्या माहिती नुसार सोमवार (दि.२१) ऑक्टोंबर ला दुपारी १२ वाजता च्या दरम्यान कन्हान पोलीस परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि काल रात्री च्या दरम्यान धरम नगर पिपरी येथे राहणार इसम नामे रोहित बाबुलाल कांबळे हा आंबेडकर चौक येथे हातात चाकु घेऊन फिरत होता. सध्या तो आपल्या घरी असुन त्याने चाकु आपल्या घरी लपवुन ठेवला आहे. अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी सदर ठिकानी जाऊन रोहित च्या नावाने आवाज दिला असता एक इसम बाहेर आला. त्याला नाव विचारले असता त्याने आपले नाव रोहित बाबुराव कांबळे (वय १८) रा.धरम नगर असे सांगितल्याने पोलीसांनी त्याचा घराची अवैध हथियारा बाबत झडती घेतली असता घराचे समोरील खोलीत भिंतीतील आलमारीत कपड्याखाली दोन चाकु मिळुन आले. रोहितला शस्त्रा बाबत परवाना विचारला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितल्याने पोलीसांनी आरोपी रोहित कांबळे ला अटक करुन त्याचा विरुद्ध कन्हान पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला.

# नोकरीच्या नावावर केली फसवणूक

**नागपूर :** मर्चंट नेव्हीत नोकरी लावून देण्याची थाप मारून तिघांनी एका तरुणाची 2.45 लाख रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी हार्दिक नितीन धर्मिजवार (21) रा. शिवकृपानगर, बेसाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. इंद्रजित राठोड रा. व्यंकटेश सिटी, बेसा रोड, प्रकाश शाहू आणि नीलेश कांबळे अशी आरोपींची नावे आहेत.

हार्दिक श्रीजी शिपिंग कंपनी, गुजरात येथे कार्यरत आहे. आरोपी इंद्रजित मर्चंट नेव्हीत थर्ड ऑफिसर म्हणून काम करतो, तर प्रकाश आणि नीलेश उत्कल शिपिंग मॅनेजमेंट कंपनी, बेलापूर, मुंबई येथे कार्यरत आहेत. एकाच भागात रहात असल्याने हार्दिक आणि इंद्रजित यांच्यात ओळख होती.

हार्दिकची मर्चंट नेव्हीत काम करण्याची इच्छा होती. त्याने इंद्रजितला याबाबत माहिती मागितली. इंद्रजितने त्याला उत्कल शिपिंग कंपनीत 15 दिवसांचे प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यासाठी चार लाख रुपये खर्च येणार होता. हार्दिकने इतके पैसे नसल्याचे सांगितले आणि विशाखापट्टनम येथे दुसऱ्या संस्थेतून दोन लाख रुपयांत प्रशिक्षण घेतले. त्यानंतर इंद्रजितने नोकरीसाठी उत्कल शिपिंग कंपनीचे प्रकाश शाहू आणि नीलेश कांबळे यांना भेटण्यास सांगितले.

# शेकडो वर्ष जुन्या पुलाचा जिर्णोद्धार

**नागपूर :** मध्य रेल्वेच्या नागपूर रेल्वे स्थानकावरील यार्डच्या इटारसी टोकाजवळ स्थित 110 वर्ष जुन्या पुल क्र. 1042-1 वर महत्वाची जीर्णोद्धार प्रक्रिया सुरु केली आहे.

1913 मध्ये बांधलेला हा ऐतिहासिक दगडी पुल संपूर्ण वर्षभर नागपूर नगरपालिकेचे पाणी वाहून नेतो व यार्डसाठी प्रमुख जल निकासी स्त्रोत आहे. या कामगिरीचा उद्देश पुलाची सेवा कालावधी वाढवणे, जलप्रवाह क्षमता सुधारणे आणि संरचनात्मक सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे.

कालांतराने, पुलामध्ये मातीचे गारे तुटणे, दगड हलणे, पोकळी तयार होणे व सांध्यांची कमजोरी अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी मध्य रेल्वेने विशेष तंत्रज्ञान व आधुनिक उपकरणांचा वापर करुन बहालीचे काम हाती घेतले आहे, जल मागार्ची साफसफाई, स्क्रू जॅक आणि जॅकेटिंग व स्टील फ्रेम यांचा वापर केला जात आहे.

# मेंढला येथील स्वस्त धान्य दुकानाला सरपंचांनी ठोकले कुलूप

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २५ :

तालुक्यातील मेंढला येथील स्वस्त धान्य दुकान नेहमी वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. खूप वेळा ग्राहकांनी या बाबत तक्रार सुध्दा केली आहे. मेंढला येथे सिमा पोटपीटे यांचे शासकीय स्वत धान्य दुकान आहे. महिन्यातून तीन ते चार वेळा ही दुकान उघडल्या जात असून ग्राहकांना धान्याचे वितरण केल्या जात नाही.

धान्याची उचल न करता सुध्दा दुकानात धान्याचा साठा उपलब्ध राहत नाही. नागरिकांना त्यांच्या हक्काचे धान्य वितरित केल्या जात नाही. याबाबत विचारणा केली असता धान्यसाठा उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते.

शासनाकडून नियमित धान्यसाठा पाठवला जात असल्यावर सुध्दा नागरिकांना धान्य वितरित केल्या जात नाही. या महिन्याचा धान्यसाठा दुसऱ्या महिन्यात दिला जातो. गावकऱ्यांनी याबाबत ग्राम पंचायतला तक्रार



केली असता सरपंच नंदू चरपे, सदस्य व गावकरी यांनी स्वस्त धान्य दुकानात जाऊन पाहणी केली असता दुकानं धान्यसाठा उपलब्ध नव्हता.

गावकऱ्यांनी धान्य दिले नसताना सुद्धा धान्यसाठा नसल्यामुळे संतप्त झालेल्या सरपंच नंदू चरपे व गावकऱ्यांनी स्वस्त धान्य दुकानाला कुलूप ठोकले व या बाबत उपविभागीय अधिकारी काटोल, तहसीलदार, पुरवठा निरीक्षक, यांच्याकडे तक्रार दाखल करून स्वस्त धान्य दुकान मालक सीमा पोटपिटे यांच्या विरुद्ध कडक कार्यवाही करण्याचे तक्रारीत नमूद केले.

स्वस्त धान्य दुकाणदाराने 144 लाभरत्याना धान्य वाटपच केले नाही. वारवार दुकानदाराला समज देऊन सुध्दा तो याकडे दुर्लक्ष करत आहे.

त्यामुळे उपविभागीय अधिकारी काटोल, तहसीलदार नरखेड, पुरवठा अधिकारी नरखेड यांच्याकडे नागरिकांच्या सह्यानी तक्रार दाखल केले आहे. स्वस्त धान्य दुकानदारांचा परवाना निलंबित करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिपक चापेकर सामाजिक कार्यकर्ता मेंढला यांनी दिला आहे.

# मतिमंद बाल आश्रमात मिठाईचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २५ :

दाभा येथील जीवनधारा मतिमंद बाल आश्रमातील दिव्यांग विद्यार्थ्यांना दिवाळी निमित्त खाऊ, मिठाई व कपड्यांचे वाटप शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. आश्रमातील दिव्यांग विद्यार्थ्यांची दिवाळी साजरी व्हावी.

या उद्देशाने गुरुपुष्यामृत व पुष्य नक्षत्रावर ही दिवाळी भेट दिल्याचे मानसिंग ठाकूर यांनी सांगीतले. यावेळी रामनिवास अग्रवाल, मानसिंग ठाकूर, धर्मेंद्र सिंग, नमो नाथ सिंग, शुभम अग्रवाल,धर्मेंद्र पांडे, रवी सिंग आदींनी सहकार्य केले.



# कोतेवाडा येथील विद्यार्थ्यांनी घेतली सरपंचांची मुलाखत

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २५ :

हिंगणा तालुक्यातील गुमगाव नजीकच्या कोतेवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षा मोडक यांच्या समवेत जाऊन ग्रामपंचायत कार्यालयात कोतेवाडाचे सरपंच देवेंद्र आष्टणकर यांची मुलाखत घेतली.



मुलाखतीत विदयार्थ्यांनी विविध प्रश्न विचारली. सर्वच प्रश्नांची उत्तरे देवेंद्र आष्टनकर यांनी विस्तृतपणे आणि विद्यार्थ्यांना प्रेरणादायी अशा भाषेत दिलीत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्तम काम करणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षा मोडक यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्न विचारण्याच्या शैलीवरून विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य खूप चांगले विकसित झाल्याचे सरपंचांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी काही प्रश्न इंग्रजीत तर काही प्रश्न मराठीमध्ये विचारलीत. मुलाखतीतील प्रश्न व त्याची संपूर्ण तयारी शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षा मोडक यांनी करून घेतली होती.

मुलाखती अखेर सरपंचांनी मुलांना खाऊचे वाटप केले व विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर फार कमी करा व अभ्यास जास्तीत जास्त करण्याचा सल्ला दिला. गावात पहिल्यांदाच असा उपक्रम राबविल्याबद्दल हर्षा मोडक यांना शुभेच्छा सुद्धा दिल्यात.

## NOTICE INQUIRY
## (Form No.2)

शा.मुंबई-१,४०,०००-१-२००५-एचएफ-१४० विशेष-ध. आ. मुं.सा.वि./१९-म.ACC1

कार्यालयाना पत्ता: जा.क्र. ACC1/८६५२/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिविल लाईन्स, नागपूर-०१
दिनांक-२७१८/२४

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, नागपूर विभाग, नागपुर.....................प्रदेश,

चौकशीची नोटीस

(सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, सन १९५० यांचे कलम ४१-A)

सन २०२४ चा अर्ज क्र. ९५/२०२४-४१- A

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था **जेष्ठ नागरिक मंडळ, नागपूर (पश्चिम) लक्ष्मीनगर, नागपूर एफ-१००८८** (नागपूर)....यांस

..................**डॉ. सुधिर बोधनकर**..................यांनी

**कलम ४१-A** अन्वये केलेला अर्ज

**कलम ४१-A** अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात.

**१. श्री. भास्कर गोडबोले.........यांस**

कलम १८ अन्वये नोंदणीसाठी

ज्याअर्थी खाली सही करणार यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधात...............

त्याअर्थी तुम्हारा ही नोटीस देण्यात येत आहे आणि फर्मावण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, खाली सही करणार यांचेसमोर वर दिलेल्या पत्यावर तारीख माहे रोजी २७/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसुर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

**आज दिनांक..** २६.०८.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धमार्दाय आयुक्तांच्या नागपुर शिक्क्यानिशी दिली.

अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

## PUBLIC NOTICE

Process No: 17029
Date: 23/10/24

IN THE COURT OF 7th Jt CIVIL JUDGE SR.DN., NAGPUR. (M.S.)

Room No.416
Succession Case No.290/2024 Fixed for : 27/11/2024

Applicants: 1) Prakash Hemant @ Hemchandra Narnaware
2) Avinash Hemant Urf Hemchandra Narnaware
3) Jyoti Surendra Ramteke @ Ku Jyoti Hemant Hemchandra Narnaware 4) Minakshi Rakesh Gajbhiye @ Minakshi Hemant @ Hemchandra Narnaware 5) Vidya Suraj Narnaware Wd/o Suraj S/o Hemant Narnaware
All R/o.Plot No.216, Siddharth Nagar Teka Kamptee Road, Nagpur
----- Versus -----
Non Applicants: Nil
Name of Deceased: Late Krushnabai Hemant @ Hemchandra Narnaware Died On: 26/07/2023
R/o. 116, Sidharth Nagar, Teka, Nagpur

Whereas Late Krushnabai Hemant @ Hemchandra Narnaware Died On: 26/07/2023 R/o. 116, Sidharth Nagar, Teka, Nagpur Died at Nagpur and Whereas Prakash Hemant @ Hemchandra Narnaware & others has presented an application to this court for grant of Succession Certificate U/s. 372 of Indian Succession Act, In respect of the Arrears Pensionary benefits in the name of the deceased & left by the deceased.

This is to give Public Notice to all persons who may dispute the right of the said Applicant Prakash Hemant @ Hemchandra Narnaware & others as successor, of the deceased, to appear in the Court of 7th Jt Civil Judge St Dn. Nagpur on 27th day of Nov, 2024 at 10.30 a.m. There to enter their objections and it is here by declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate on Succession of the said deceased. Given under my hand and the seal of the Court this day of 23rd day of Oct, 2024.

By order of the Court
Asstt. Supdt. (T.W.)
Court of Civil Judge Sr. Dn. Nagpur

# याज्ञवल्क्य जिचकार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २५ :

मतदार राजा जागा होऽऽऽ, घराणेशाही ला बाजूला करा. नव्या दमाला साथ द्या, म्हणत काटोल विधानसभा मतदारसंघातील हजारो युवक, युवती व शेकडो ज्येष्ठ नागरिकांचे साक्षीने ज्ञान योगी/कर्मयोगी कांग्रेस चे कर्मठ नेते दिवंगत डॉ. श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार यांनी २५ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजता काटोल विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार म्हणून काटोल विधानसभा निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पियुष चिवंडे यांचे कडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे.



निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्यापुर्वी उमेदवारी अर्ज भरण्याप्रसंगी उपस्थित हजारो युवक युवतींन समक्ष सांगितले की, फक्त आमदार बनन्यापलिकडे काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावकरी मतदार युवक यांचे पर्यंत सर्व योजनांचा पाठपुरावा करून मतदार संघातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचविण्यासाठी मी निवडणूक लढवत आहो. आपण नशिबवान आहोत की, काटोल विधानसभा मतदार संघाला २५वर्ष मंत्रीपद होते. खरे तर २५वर्षात काटोल बारामती बनायला हवे होते.

नाही १००%तर कमित कमी १०%तरी बारामती बनायला पाहिजे होते. राज्य महागाई बेरोजगारी व शेतकऱ्यांचे सोयाबीन, संत्रा, कपाशीचे मालाला भाव नाही. रोजगारावर कुणितरी बोललं पाहिजे, पण! नाही, या समस्या सोडविण्यासाठी सत्ताधारी पक्ष ही गंभीर नाही, तर विरोधक ही या समस्यांना सिरियसली घेत नाही.

बेरोजगारी मुळे युवक निराश होत व्यसनाधीनते जातांना दिसत आहे. बरे असो! आतापर्यंत आपणा समोर पर्याय नव्हता आता नवा चेहरा म्हणून मी आपाणासमोर आलो आहे.

मागील दोन वर्षांपासून मी सतत काटोल विधानसभा मतदार संघातील गावा गावात जाऊन बेरोजगारी, महिला, शेतकरी समस्या जाणून घेऊन काही बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात यशस्वी झालो. पुढे ही मदत करत राहूच. माझे स्वप्न नाही, आपण काटोल चे सर्वांगीण विकासासाठी उमेदवारी अर्ज दाखल करत आहो. या करिता युवकांचे सहकार्याची तर ज्येष्ठांचे आशिर्वाद घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

याप्रसंगी याज्ञवल्क्य जिचकार यांच्या मातोश्री राजश्री जिचकार, बहिण मैत्री जिचकार, काका सुरेंद्र जिचकार उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरतांना हजारोंचा जनसमुदाय या भागातील भारतीय जनता पार्टी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेत्यांना धसका भरवणारी ही जनजागृती रॅली होती.

# हिंदू देवी देवतांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय बजरंग दल मैदानात



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २५ :

राष्ट्रीय बजरंग दल रामटेक विधानसभा कार्याध्यक्ष पंकज (गोलु) सिंह यांच्या नेतृत्वात व आंतरराष्ट्रीय हिंदु परिषद नागपूर जिल्हा मंत्री राजेश बोपुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कन्हान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये ज्या फटाक्यामध्ये हिंदू देवी देवतांचे फोटो आहेत असे फटाके बनवुन विकणाऱ्या फटाके कंपनीवर तुरंत कारवाई करण्यात यावी अशा प्रकारची मागणी निवेदनात करण्यात आली.

राष्ट्रीय बजरंग दल कन्हान शहर अध्यक्ष हिमांशू कोसरकर, उपाध्यक्ष रोहित कनोजे, व राष्ट्रीय बजरंग दल सदस्य गुड्डा सूर्यवंशी, आनंद शर्मा, उमेश भोयर, बाला शंकर मिश्रा, जीवन ठवकर, चेतमनी मिश्रा, करण कुंभलकर, तुषार ईखार, रणजीत भैय्या, विक्रम सोलंकी, तसेच राष्ट्रीय बजरंग दलचे सदस्य उपस्थित होते.

# रेल्वे संरक्षण दलाने वाहिली शहीद जवानांना श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

रेल्वे संरक्षण दल महासंचालक/आर पी एफ/रेल्वे बोर्ड, न्यू यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय स्तरावर सुरू असलेल्या 'शहीद सप्ताह' स्मरणाचा एक भाग म्हणून गेल्या वर्षी कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या आपल्या 14 जवानांना श्रद्धांजली अर्पण करत आहे.

दिल्ली असायची. आदर आणि स्मृती म्हणून, आर पी एफ अधिकारी नऊ राज्यांतील या शूर व्यक्तींच्या अल्मा माटर आणि वडिलोपार्जित गावांना भेट देत आहेत. या मनःपूर्वक श्रद्धांजली आर पी एफ आणि या धैर्यवान आत्म्यांना आकार देणारे समुदाय यांच्यातील सखोल संबंध वाढवतात आणि त्यांच्या बलिदानाच्या महत्त्वावरही भर देतात.

सन्मानित करण्यात येणाऱ्या शहीदांमध्ये ईस्ट कोस्ट रेल्वेचे आरपीएफ हेड कॉन्स्टेबल निराकर बेहरा यांचाही समावेश आहे, ज्यांनी फेब्रुवारी 2024 मध्ये कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान दिले. 21 ऑक्टोबर




रोजी खुर्दा रोड विभागातील आर पी एफ कर्मचाऱ्यांनी ओडिशातील गंजाम जिल्ह्यातील नेतंगा, एम ई स्कूल, एम ई स्कूल येथे त्यांच्या स्मृती सभेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि सहकारी यांचा भावनिक मेळावा पाहायला मिळाला. त्यांच्या विधवा श्रीमती गीतांजली बेहरा यांनी त्यांच्या पतीच्या बलिदानाला मान्यता दिल्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

रेल्वे संरक्षण दलाचे महासंचालक मनोज यादव म्हणाले, "या प्रत्येक शूर आत्म्याने सेवा आणि त्यागाच्या सर्वोच्च आदर्शांचे उदाहरण दिले आहे. त्यांचा वारसा आम्हाला आमच्या रेल्वे आणि प्रवाशांची सुरक्षा राखण्यासाठी नेहमीच प्रेरणा देईल." संपूर्ण भारतात, आर पी एफ आपल्या देशाच्या विविध भागात त्यांच्या मूळ गावांमध्ये आणि शाळांमध्ये शहीदांच्या सन्मानार्थ समान स्मरण कार्यक्रम आयोजित करत आहे.

प्रत्येक शहीदांच्या कुटुंबियांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि शुभेच्छा देऊन सन्मानित करण्यात येत असून, त्यांच्या प्रियजनांनी केलेले बलिदान कधीही विसरता येणार नाही, हे स्पष्ट केले आहे. संपूर्ण आठवडाभर नियोजित क्रिया कलापांसह, आर पी एफ च्या शौर्य, बलिदान आणि समर्पणाचा सन्मान करण्यासाठी आर पी एफ च्या शौर्य, बलिदान आणि समर्पणाचा सन्मान करण्यासाठी आपल्या मृत वीरांच्या स्मरणासाठी केलेले प्रयत्न, सखोल आणि चालू असलेल्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतात, शहीद सप्ताह साजरा करत असताना, या वीरांचा अदम्य आत्मा त्या रेल्वे मार्गांवर सतत गुंजत राहतो ज्यांचे त्यांनी इतक्या परिश्रमपूर्वक संरक्षण केले. त्याच अनुषंगाने, 21.10.2024 रोजी पोलीस शहीद स्मृती दिनानिमित्त, दीप चंद्र आर्य/ आर.ई.एस. बी., एस.पी.एम.आर. नागपूर विभाग यांच्या नेतृत्वाखाली, आर.एस.बी ./एस.पी.आर.नागपूर. दीप चंद्र आर्य/आर.एस.बी., एस.पी.आर यांनी डे परेड आयोजित करून शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली. शहिदांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर, सीएसके ब्लड बँक रामपेठ, नागपूर यांच्या सौजन्याने आर एस यू न्यू बॅरॅक मोतीबाग, नागपूर येथे शहीद जवानांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान कार्यक्रमात सर्वप्रथम दीपचंद्र आर्य, एम.एस.यू.ए , आर पी एफ नागपूर यांनी स्वतः रक्तदान करून इतर दलातील सदस्यांना प्रोत्साहन दिले.

# कोराडी औष्णिक विद्युत केंद्राद्वारे आयोजित रक्तदान शिबीरास प्रचंड प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त, २४ ऑक्टोबर २०२४ रोजी, विद्युत विहार कोराडी येथील दवाखान्यात आयोजित रक्तदान शिबीरास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

येथील अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय, कंत्राटदार, कंत्राटी कामगार, या सर्व रक्तदात्यांनी विक्रमी २१३ रक्तपिशव्या दान करून नवा उच्चांक नोंदविला. अधीक्षक अभियंता सचिन भगेवार यांनी सपत्नीक रक्तदान करून सर्वांपुढे आदर्श ठेवला.

रक्तदानाच्या राष्ट्रीय कायार्साठी, रक्तदात्यांना प्रोत्साहित करण्यासाठी, कोराडी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये आणि विद्युत विहार वसाहतीमध्ये जनजागृती आणि प्रसिद्धी अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी, कार्यक्रमाचे अध्यक्ष व शिबिराचे उद्घाटक, कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, प्रमुख पाहुणे कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता



सुनील सोनपेठकर, उप मुख्य अभियंते शैलेन्द्र कासूलकर, सचिन देगवेकर, भास्कर इंगळे, केंद्रातील सर्व अधीक्षक अभियंते, वैद्यकीय अधिक्षक डॉ. अमित ग्वालवंशी, वैद्यकीय अधिकारी कुणाल बावणे, कल्याण अधिकारी मयूर मेंढेकर, समन्वयक प्रविन बुटे, वर्धापन दिन सचिव महेश घुरीले, सह सचिव जनार्दन तिजारे, दवाखाना विभागातील स्नेहा तेलरांधे, जीवन ज्योती ब्लड बँकेचे डॉ. मानकर, डॉ. सौ. शीला मुंधडा, सौ. सरोज पवणीकर, कर्मचारी आणि वीज केंद्रातील विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, रक्तदान शिबीर आयोजन समितीचे पदाधिकारी आणि सदस्य, सर्व संघटना पदाधिकारी/प्रतिनिधी, कर्मचारी, वसाहतीं मधील रहिवाशी आणि कंत्राटी कामगार बहुसंख्यने उपस्थित होते.

संचालन व आभार प्रदर्शन स्नेहा तेलरांधे यांनी केले. सर्व रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी जपत, या राष्ट्रीय कार्यामध्ये स्वयं:प्रेरणेने सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे विक्रमी सहभाग नोंदवल्या बद्दल मुख्य अभियंता विलास मोटघरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# रामटेक येथे १४ नोव्हेंबरला वैकुंठ चतुर्दशी निमित्त शोभायात्रेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

१४ नोव्हेंबरला वैकुंठ चतुर्दशी निमित्य शोभायात्राचे आयोजन करण्यात आले आहे. अगस्ती आश्रमचे ब्रह्मलीन संत आणि भारतीय जनसेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष गोपालदास बाबा यांच्या द्वारे ४२ वर्षा पूर्वी प्रथम शोभायात्रा सुरु करण्यात आली होती. यावर्षी शोभायात्रेचे ४३ वे वर्ष आहे.



रामलेश्वर मंदिर येथे शोभायात्रा आयोजना करिता सभा घेण्यात आली होती. यावेळी भारतीय जनसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रपाल चौकसे, सचिव माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी सभेला भारतीय जनसेवा मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, सहसचिव सुभाष बघेले, धनराज काठोके, अशोक पटेल, नत्थू घरजाळे, शंकरराव चामलाटे, विनायक डांगरे, ऋषिकेश किंमतकर सहित मोठया संखेत रामभक्त उपस्थित होते.

शोभायात्रा संचलनासाठी समित्या गठीत करण्यात आल्या.

यामध्ये आर्थिक समितीत अशोक पटेल व ऋषिकेश किंमतकर, देखरेख नियंत्रण समितिमध्ये राहुल कोठेकर, शोभायात्रा मार्ग समिति मधे आलोक मानकर, चेतन चौकसे, अमित मेहर, सौरभ दुबे, अमय दिघे, भोजन व्यवस्था मधे मारूती ठाकरे, गोपाल काठोके, अन्य समितीमध्ये संजय मुलमुले, दिलीप देशमुख, उमेश पटले, सतीश दुनेदार, सुधीर सेलोकर, मंच व्यवस्था समिति मधे नानाभाऊ उराडे, करीमभाई मालाधरी, फिरोज मालाधरी, झांकी समिति मधे हुकुमचंद बडवाईक, विजय सलामे, मीडिया समिती मधे अनिल वाघमारे, शेखर पाटील, अजय मेहरकुळे, आणि इतर फोटोग्राफी मध्ये गोलू महाजन, प्रवीण मानापुरे, झांकी नियंत्रण समिति मधे अजय खेडगरकर, सुभाष नागपुरे, सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था, लाल बहादूर शास्त्री मंडळ, बेटी बचाव बेटी पढाव संस्था, वाईल्ड लाईफ चॅलेंजर, अठरा भुजा गणेश मंडळ, एकविरा भक्तगण, शीतला माता देवी संस्थान सहित अनेक सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मुलांना लागला काकडारतीचा नाद !

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. २५ :

जवळच्या वडगाव येथील हनुमान मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही पहाटे काकडआरती सुरू झाली आहे. त्यामध्ये अनेक किशोरवयीन मुले व युवक उस्फूर्तपणे सहभाग घेत आहे. ते नित्यनेमाने पहाटे उठून, काकड आरतीला हजर होऊन टाळ मृदंगाच्या तालावर तल्लीन होऊन थिरकतात. त्यामुळे



त्यांना भक्तिमागार्चा नाद लागल्याचे निदर्शनास येते. काकड आरतीची आनंद पर्वणी कार्तिक पौर्णिमेला म्हणजे 16 नोव्हेंबरला संपणार आहे. असे सहभागी वेदांत शेंडे, उदय लढी, प्रवीण लढी, योगेश लढी,समीर शिंदेकर, कार्तिक लढी, सौरभ शेंडे, संकेत लढी, राजू धोटे, प्रकाश धोटे, डंपी कुंभरे,कुलदीप शेंडे, सुजित लढी, पीयूष लढी, नक्ष धोटे, गौरव धोटे यांनी सांगितले.

# बाल रंगभूमी परिषदेच्या दिव्यांग महोत्सवाचा थाटात समारोप



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

बाल रंगभूमी परिषद मध्यवर्ती शाखा मुंबईच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात दिव्यांग मुलांचा कला महोत्सव सुरू असून त्या अंतर्गत बाल रंगभूमी परिषद नागपूर शाखेतर्फे गुरुवारी सुरेश भट सभागृहात दिव्यांग महोत्सव थाटात पार पडला.

या ऐतिहासिक महोत्सवात नागपूर जिल्ह्यातील 25 दिव्यांग शाळा/संस्थांतील 378 विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, योगा, चित्रकला, रांगोळी या विविध कला एका पेक्षा एक सरस अशा सादर करून 'हम भी किसीसे कम नहीं, यहाँ के तो हम सिकंदर' हे सिद्ध केले. त्यांच्यातील कलागुणांना मिळालेल्या या संधीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर फुलून दिसत होता. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे स्टॉलदेखील या महोत्सवात लावण्यात आले होते.

नागपूर जिल्ह्यातील कलाप्रेमींनी मोठ्या संख्येत महोत्सवाला उपस्थित राहून दिव्यांग कलाकारांचे कौतुक केले.

महोत्सवाच्या उद्घाटनाला जयसिंगराव चौहान, सुभाष कोटेचा, ॲड. रमण सेनाड, निलेश खांडेकर, आभा मेघे यांची उपस्थित होती तर समारोपाला मध्यवर्ती शाखा मुंबईच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के सामंत, नंदकिशोर जुवेकर, विजय मुनिश्वर, डॉ नितीन विघ्ने, डॉ प्रतिमा शास्त्री, विष्णू मनोहर, समाज कल्याण अधिकारी प्रवीण मोंढे, रमेश लखमापूरे, अरुणा पुरोहित यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर राशी, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. शिक्षकांचा देखील सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ॲड. नीलम शिर्के सामंत यांनी विद्यार्थ्यानां मार्गदर्शन करून त्यांनी केलेल्या उत्तम सादरीकरणाबद्दल कौतुक केले व बाल रंगभूमी परिषद सदैव तुमच्यासोबत राहील, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय रहाटे यांनी तर संचालन आणि आभार प्रदर्शन अनिल देव यांनी केले.

# कला सागरच्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाची सांगता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

दोन मैत्रिणींच्या जीवनावर आधारित लेखक यतीन माझिरे व दिग्दर्शक सौरभ कांबळे यांची एकांकिका वीसचं गणित, नियतीचा खेळ प्रस्तुत करणारी लेखक सोपान खंते व दिग्दर्शक शंतनु जोशी यांची द ब्लॅक एंड, दर्शन संबलवार दिग्दर्शित पूनम की वो काली रात आणि लेखक व दिग्दर्शक श्याम आस्करकर यांची शुभमंगल सावधान या सुख-दुःखाचा पट मांडणा-या एकांकिकांनी बहुभाषी नाट्य



महोत्सवाचा चौथा दिवस गाजला.

कला सागर या सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने व विदर्भ हिंदी साहित्य संमेलनच्या सहकार्याने 19 वा एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सव स्व. रामगोपाल माहेश्वरी सभागृह, मोर हिंदी भवन येथे सुरू आहे.

महोत्सवाच्या चौथ्या दिवशीच्या उद्घाटनाला बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रमोद बारई, चित्रपट निमार्ते भीमराव मेश्राम, कलासागरचे सचिव डॉ. रमेश बारस्कर, कार्यकारी सदस्य विनोद गाजर्लवार, व डॉ. मीना कटोच यांची उपस्थिती होती. परीक्षक म्हणून डॉ. श्रीमती हेमलता मिश्र मानवी, विनोद गाजर्लवार व शक्ती रतन यांनी जबाबदारी सांभाळली.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **MAIFUZ ALI.** NOW MY NEW NAME IS **MEHFOOZ ALI.**
**ADD :** PLOT NO 40 SARTAJ COLONY BADA TAJBAG NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **AHMED MUSTAKIM KHAN.** NOW MY NEW NAME IS **AHMAD KHAN MUSIBAT ALI.**
**ADD :** PLOT NO.120,SAI SEVASHRAM SOCIETY, NEAR GOREWADA CHOWK, UTTHAN NAGAR, NAGPUR 440013 MS

MY OLD NAME WAS **MUSTAKIM KHAN.** NOW MY NEW NAME IS **MUSIBAT ALI.**
**ADD :** PLOT NO.120,SAI SEVASHRAM SOCIETY, NEAR GOREWADA CHOWK, UTTHAN NAGAR,NAGPUR 440013 MS

MY OLD NAME WAS **AHMED KHAN.** NOW MY NEW NAME IS **AHMAD KHAN MUSIBAT ALI.**
**ADD :** PLOT NO.120,SAI SEVASHRAM SOCIETY, NEAR GOREWADA CHOWK, UTTHAN NAGAR,NAGPUR 440013 MS

MY OLD NAME WAS **ASMA BEGUM KHAN.** NOW MY NEW NAME IS **ASMA BEGUM AHMAD KHAN.**
**ADD :** PLOT NO.120,SAI SEVASHRAM SOCIETY, NEAR GOREWADA CHOWK, UTTHAN NAGAR,NAGPUR 440013 MS

MY OLD NAME WAS **MOHMOOD KHAN SHABBIR KHAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD MAHMOOD KHAN.**
**ADD :** ALOOWALE KI CHAL SAIFY NAGAR MOMINPURA NAGPUR 440018

I **NARJIS FATEMA** DECLARED THAT MY SON PASSPORT MY INCORRECT NAME WAS **MUJTABA MEHDI.** NOW CORRECT NAME IS **MUJTABA SURNAME MEHDI**
**ADD :** HUSAINBAD HAMALPURA KAMPTEE NAGPUR PASSPORT NO. AA069545

# आयकर अधिकाऱ्यांनी आदेश तसेच नोटीस देताना भाषेकडे लक्ष देणे अत्यावश्यक : विकास सिरपुरकर

## आयकर सहाय्यक आयुक्तांच्या 'उत्तरायण २०२४' या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

सामान्य नागरिकांच्या जीवनामध्ये बदल घडवून आणणाऱ्या करविषयक बाबींमध्ये आयकर अधिकाऱ्यांनी आदेश तसेच नोटीस देताना भाषेकडे लक्ष देण अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांनी आज नागपूर मध्ये केले.




आयकर अधिकारी पदावरून नव्याने पदोन्नती मिळालेल्या सहाय्यक आयुक्तांच्या 'उत्तरायण -2024' या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप आज त्यांच्या उपस्थितीत नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अर्कॅडमी -एनएडीटी येथे पार पडला त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी एनएडीटीचे प्रशिक्षण महासंचालक पी. सेल्वा गणेश, अतिरिक्त महासंचालक मुनीष कुमार, उत्तरायण 2024 चे प्रशिक्षण संचालक एस.एम.व्ही.व्ही. शर्मा तसेच या अभ्यासक्रमाचे प्रभारी अतिरिक्त महासंचालक आकाश देवांगन प्रामुख्याने उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये एकनिष्ठता अभ्यासपूर्ण दृष्टिकोन कायम ठेवावा असे सिरपूरकर सांगितले. आयकर आदेशातील सर्व तथ्यांचा अभ्यास करून त्या पुन्हा पुन्हा तपासल्या पाहिजे असेही आवाहन त्यांनी आयकर अधिकाऱ्यांना केलं.

याप्रसंगी उत्तरायण 2024 या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रशिक्षण संचालक एस.एम.व्ही.व्ही. शर्मा यांनी तुकडीचा अहवाल मांडतांना सांगितले की, गत सप्टेंबर महिन्याच्या 9 तारखेपासून सुरु झालेल्या या 7 आठवड्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात 150 नव्याने पदोन्नत झालेल्या सहाय्यक आयकर आयुक्त अधिकारी प्रशिक्षणार्थींचा समावेश होता. यात 20 महिला अधिकाऱ्यांचा देखील समावेश असून सर्वात जास्त अधिकारी हे बिहार राज्यातील आहेत. या तुकडीचे सरासरी सेवा वय हे 28 वर्ष असून या तुकडीतील सर्वात तरुण अधिकारी हे 45 वषार्चे तर सर्वात ज्येष्ठ अधिकारी हे 59 वषार्चे आहेत.

याप्रसंगी काही प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी या प्रशिक्षणासंदर्भात आपले अनुभव कथन केले. प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तर सीमा भारती आणि ऐला श्रीनिवास यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रधान महासंचालकांचे सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

उत्तरायण 2024 च्या अधिकाऱ्यांनी एनएडीटीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमा भेट स्वरूपात दिल्या आहेत. या प्रतिमांचं अनावरण सुद्धा शिरपूरकर यांच्या हस्ते झालं. अतिरिक्त महासंचालक मनीष कुमार यांनी कर्तव्य निष्ठतेची शपथ अधिकाऱ्यांना दिली.

# बेपत्ता अल्पवयीन मुलीला पोलिसांनी काढले शोधून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

बारावीत शिकणारी एक अल्पवयीन मुलगी अचानक घरून बेपत्ता झाली. अपहरणाच्या तक्रारीनंतर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने तिचा शोध घेतला असता ती मित्राच्या घरी मिळाली. तिची त्याचे घर सोडायला तयारच नव्हती. पोलिसांनी तिचे समुपदेशन केले आणि नंतर कुटुंबीयांच्या स्वाधिन केले.

वाठोडा हद्दीत राहणारी 17 वर्षांची पिंकी (बदललेले नाव) ही आई-वडील आणि भावासोबत राहते. ती नागपूरपासून 60 किमी अंतरावरील एका महाविद्यालयात बारावीची विद्यार्थिनी आहे. दरम्यान तिची पंकज (बदललेले नाव) याच्याशी ओळख झाली. पंकज 24 वर्षांचा असून मिनी ट्रक चालवतो. ओळखीचे रुपांतर मैत्रीत आणि मैत्रीचे प्रेमात व्हायला उशिर लागला नाही. त्यांच्यात नेहमी मोबाईलवर बोलणे होत होते.

19 ऑक्टोबर रोजी पिंकी अचानक घरी कोणाला काही न सांगता निघून गेली. रात्री उशिरापर्यंतही तिचा पत्ता नसल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. मात्र ती मिळाली नाही. शेवटी वाठोडा ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली.

अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्याने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने तपास सुरू केला. चौकशीदरम्यान कुटुंबीयांनी पंकजवर संशय व्यक्त केला. कारण पिंकी यापूर्वीही पंकजच्या घरी रहायला गेली होती. पथकाने पंकजच्या मोबाईलवर कॉल करून माहिती घेतली. पथक त्याच्या घरी पोहोचले असता पिंकी तेथेच होती.

तिने पोलिसांसोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला. पथकाने दोघांचेही समुपदेशन केले आणि पिंकीला कुटुंबीयांच्या स्वाधिन केले. ही कारवाई पोनि ललिता तोडासे यांच्या नेतृत्वात सफौ. राजेंद्र अटकाळे, गजेंद्रसिंग ठाकूर, पोहवा सुनील वाकडे, श्याम अंगुथलेवार, पल्लवी वंजारी, अश्विनी खोडपेवार आणि वैशाली किन्हीकर यांनी केली.

# मनपाची दिवाळी निरुपयोगी वस्तू संकलन मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

नागपूर महानगरपालिकेने स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानंतर्गत घरातून निघणाऱ्या वापरात नसणाऱ्या वस्तूंचा स्वीकार करण्यासाठी मनपाने दहाही झोन निहाय संकलन/स्वीकार केंद्रे उभारले असून, शनिवार २६ ते सोमवार 28 ऑक्टोबर या कालावधीत दिवाळीतील निरुपयोगी वस्तू संकलन मोहीम राबविण्यात येत आहे.

नागरिकांनी आपल्या जवळच्या केंद्रावर वगीर्कृत स्वरूपातील कचरा आणून द्यावा व आपल्या शहराला स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूकर साकरण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल व अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेद्वारे स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियान राबविण्यात आले आहे. या अंतर्गत दिवाळीतील निरुपयोगी वस्तू संकलन मोहीम सुरु करण्यात आली असून, नागरिकांच्या सोयीसाठी केंद्र उभारण्यात आले आहे.

नागरिक या केंद्रांवर त्यांच्या घरांच्या स्वच्छतेदरम्यान निर्माण होणारा ई-कचरा, कागद, काच, कपडे, खेळणी इत्यादी अनावश्यक आणि निरुपयोगी वस्तू जमा करू शकतात.

तसेच इतर कोणत्याही माहितीसाठी नागरिक 8308357073 या मोबाईलवर संपर्क साधू शकतात. डीटीडी कचरा वाहू वाहनांचे ऑडिओ संदेश आणि रेडिओ प्रसारणाद्वारेही या मोहिमेबाबत नागरिकांना जागरूक केले जात आहे.

# एमडीसह तरुणास अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

अजनी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तरुणाला अंमली पदार्थासह अटक केली. करणसिंग महेंद्रसिंग ठाकूर (21) रा. इंदिरानगर, जरीपटका असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मध्यरात्री 1 वाजताच्या सुमारास अजनी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. हनुमाननगरच्या त्रिकोणी मैदानाजवळ पोलिसांना करण दुचाकी वाहनावर संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने पळ काढला. संशय बळावल्याने पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये करणजवळ 8 ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्स मिळाले.

पोलिसांनी त्याच्याकडून वाहनासह 1.20 लाख रुपयांचा माल जप्त केला. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वय गुन्हा नोंदविला. करण एका मोठ्या ड्रग्स पेडलरसाठी काम करीत तो परिसरात कोणाला तरी माल पोहोचविण्यासाठी आला होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली आहे. पोलिस त्याला माल देणाऱ्यासह खरेदी करणाऱ्याचा शोध घेत आहेत.

# सुरक्षित दिवाळी साजरी करीत सणाचा आनंद व्दिगुणित करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

प्रकाशपर्व अर्थातच दिवाळसणाला काही दिवस शिल्लक असून तयारीची लगबग सुरु झाली आहे. सर्वत्र नवचैतन्याचे वातावरण आहे, दिवाळीचा आनंद अधिक व्दिगुणित करण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले असून, समस्त वीज ग्राहकांना, कर्मचा-यंना आणि हितचिंतकांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा देखील त्यांनी दिल्या आहेत.

दिवाळित होणा-या रोषणाई मुळे वीज यंत्रणेवर ताण पडतो अश्यावेळी वीजेचा गरजेनुसार वापर करण्यात यावा. बाजारात कमी वीज लागनारे एलईडी दिवे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यांचा वापर करून वीजवापर नियंत्रीत ठेवा.

दिवाळीत होणारी सजावट, विद्युत रोषणाई आणि आतिषबाजी यामुळे दुदैर्वी घटना व्हायला एक कारण पुरेसे असते, अश्या घटनांनी आनंदावर विरजण पडायला वेळ लागत नसल्याने अश्या दुदैर्वी घटना टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी, दिवाळीच्या दिवशी फटाक्याने लागलेल्या आगीच्या घटना दरवर्षीच मोठ्या संख्येने होत असतात, यात केवळ वित्त हानीच नव्हे तर जिवीत हानीही मोठ्या प्रमाणात होत असते. सुरक्षिततेची खबरदारी न घेता, निष्काळजीपणा आणि उदासिनता यामुळे अश्या घटना होत असतात. आपल्या व आपल्या कुटुंबियांचा दिवाळीचा आनंद व्दिगुणित करण्यासाठी महावितरणने काही खबरदारीचे उपाय सुचविले असून त्यावर अंमलबजावणी करण्याचे आवाहनही मुख्य अभियंता यांनी केले आहे.

दिवाळी आणि दिवे यांचे एक अतूट नाते आहे, त्यामुळे दिव्यांनी घराची सजावट करतांना ती मोकळ्या जागेत लावावी. पडदे, बिछाना यापासून ते लांब असतील याची काळजी घ्यावी. लहान मुले आणि पाळीव प्राण्यांपासून दिवे दुर आणि उंचीवर तसेच पंखे, वीजतारा यापासूनही ते दुर ठेवावेत. उच्च दर्जाच्या दिव्यांच्या माळा चा वापर करावा, तुटलेल्या वीज तारा वापरु नये किंवा जोड देतांना योग्य दर्जाच्या इन्सुलेशन टेपने त्या सुरक्षित करुन घ्यावेत, तुटलेले सॉकिट्स वापरू नये, घरात कुणीही नसतांना सर्व विद्युत उपकरणे बंद करावीत.

फटाके उडविल्यानंतर त्याचा होणारा कचरा वीज यंत्रणेजवळ फेकू नका, त्या कच-याची योग्य विल्हेवाट लावा, येणा-या प्रकाश उत्सवाचा आनंद व्दिगुणित करण्यासाठी ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा व्हावा म्हणून वीज वाहिन्या व वीज उपकरणांची देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पुर्ण करण्याच्या सुचना सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांना केल्या असल्याचेही दिलीप दोडके यांनी सांगितले.

दिवाळसणात मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग असल्याने सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे वीज अपघात होणार नाही यासाठी बाजारपेठ परिसरातील कर्मचा-यांनी दक्ष राहून योग्य त्या उपाययोजना करणे, या काळात वीजपुरवठा अखंडित राहील यासाठी विभागिय अधिकारी, उपविभागिय अधिकारी व शाखा अधिकारी यांनी दिवाळी पुर्ण होईपर्यंत स्वतः जातीने उपस्थित राहण्यासोबतच या संपुर्ण प्रकाशपर्वादरम्यान सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी मुख्यालयी राहण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या असल्याचे देखील त्यांनी सांगितले.



नागपूर : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उमेदवारी अर्ज सादर करण्यापुर्वी संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, आमदार मोहन मते, कृष्णा खोपडे, प्रा.योगेंद्र कवाडे, सुलेखा कुंभारे यांच्यासह महायुतीचे नेते मोठया संख्येने उपस्थित होते.

# सोने- चांदीच्या दरात घट

नागपूर : नवरात्रीनंतर सातत्याने सोने- चांदीच्या दरात वाढ होत आहे. दिवाळी काही दिवसांवर आली असतांनाही दरवाढीचा क्रम कायम असल्याने ग्राहकांमध्ये चिंता होती. परंतु शुक्रवारी (२५ ऑक्टोंबर) नागपुरात सोने- चांदीच्या दरात घट नोंदवली गेली. त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. हल्ली सोन्याच्या दर उंचीवर गेल्याने ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे. दिवाळीपूर्वी नागपुरातील सराफा बाजारात २४ ऑक्टोंबरला बाजार बंद होतांना रात्री सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार ७०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार २०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ४०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार २०० रुपये नोंदवले गेले होते. शुक्रवारी ( बाजार उघडल्यावर सोन्याचे दर गुरूवारी रात्रीच्या तुलनेत किंचित कमी झाले आहे.



नागपुरातील सराफा बाजारात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार ४०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७२ हजार ९०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार रुपये नोंदवले गेले. त्यामुळे दिवालीच्या काही दिवसांपूर्वी सोन्याचे दर कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान दिवाळीत ग्राहक मोठ्या संख्येने सोने- चांदीचे दागिने खरेदी करतात. तर लग्न समारंभ, बारसे आणि इतरही अनेक कार्यक्रमात ग्राहक भेट म्हणून सोने- चांदीचेही दागिने देतात. त्यामुळे या काळात सोने- चांदीच्या दराकडे ग्राहकांचे विशेष लक्ष राहते. दरम्यान आता दर जास्त असले तरी पुढे ते आणखी वाढण्याचा अंदाज सराफा व्यवसायिक वर्तवत आहे. त्यामुळे आताही सोने- चांदीत गुंतवणूक फायद्याची असल्याचा सराफा व्यवसायिकांचा अंदाज आहे.

दिवाळीच्या तोंडावर नागपुरातील सराफा बाजारात २४ ऑक्टोबरला (सोमवारी) रात्री बाजार बंद होतांना चांदीचे दर प्रति किलो ९८ हजार ९०० रुपये नोंदवण्यात आले होते. परंतु हे दर दुसऱ्या दिवशी सराफा बाजार उघडल्यावर सकाळी ११ वाजता ९७ हजार १०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे नागपूरात चांदीच्या दरात प्रत्येक किलोमागे तब्बल १ हजार ८०० रुपये घट झाली आहे.

# एमपीएससीच्या पूर्वपरीक्षेचा अभ्यासक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ लिपिक टंकलेखक आणि कर सहायक, या संवर्गाकरता घेण्यात येणारी टंकलेखन कौशल्य चाचणी परीक्षा आणि त्यानंतर या परीक्षेचा निकालही कायमच वादात सापडला आहे. यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. जुलै महिन्यात टंकलेखन परीक्षा घेण्यात आली असली तरी विविध कारणांनी या परीक्षेचा निकाल आणि नियुक्त्या रखडल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र अराजपत्रित गट ब आणि गट क सेवा परीक्षेमध्ये महत्त्वाचा बदल केला आहे. त्यानुसार गट ब आणि गट क सेवेतील विविध संवर्गांची स्वतंत्र पूर्व परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन्ही सेवांसाठी अभ्यासक्रम पूर्वीप्रमाणेच राहणार असून, गट ब आणि गट क असा सेवानिहाय पूर्वपरीक्षेचा अभ्यासक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र अराजपत्रित गट ब आणि गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३ साठी जाहिरात प्रसिद्ध करून दोन्ही सेवांची संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात आली होती.

एमपीएससीच्या गट क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ नंतर यात पात्र उमेदवारांची टंकलेखन चाचणी परीक्षा घेण्यात आली. मात्र, या परीक्षेदरम्यान अनेक तांत्रिक अडचणी आल्या. यामुळे उमेदवारांनी परीक्षा पद्धतीवर आक्षेप घेतला होता. त्यानंतर परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. या परीक्षेत काही विद्यार्थ्यांना जुने संगणक दिल्याचा आरोपही केला होता. शेवटी उमेदवारांनी याविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. आयोगाने गट-क च्या तेराशे जागांसाठी जाहिरात काढली आहे. त्यामुळे या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अशा तांत्रिक अडचण येणार का? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

आयोगामार्फत विषयांकित पदांची मुख्य परीक्षा १७ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आली होती. सदर परीक्षेतून पात्र ठरलेल्या उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी ०४ ते १३ जुलै २०२४ या कालावधीत घेण्यात आली असून सदर टंकलेखन कौशल्य चाचणीत उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर ३० सप्टेंबर, २०२४ रोजी जाहीर करण्यात आली होती.

सदर टंकलेखन कौशल्य चाचणी संदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात आली. ही न्यायिक प्रकरणे विचारात घेता लिपिक-टंकलेखक व कर सहायक या संवर्गाच्या अंतिम निकालाची कार्यवाही सद्यस्थितीत प्रलंबित आहे. यासंदर्भात न्यायाधिकरणाच्या न्यायनिर्णयानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

# कारमध्ये गाय सोडून पळाले गोतस्कर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

कारने गोवंशांची तस्करी करून कत्तलीसाठी नेत असल्याच्या माहितीवरून पाचपावली पोलिसांनी सापळा रचला. मात्र आरोपी कारसोडून फरार होण्यात यशस्वी झाले. कारच्या झडतीमध्ये पोलिसांना एक गाय मिळाली.

मंगळवारी पहाटे पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मोतिबाग परिसरात एक आरोपी कारमधून गायीला कत्तलीसाठी नेले जात असल्याची माहिती मिळाली.

या माहितीवरून पोलिसांनी मोतिबाग परिसरात धडक दिली. राय आशियाना सोसायटीमागे पोलिसांना एमएच-06/एबी-2212 क्रमांकाची कार दिसली. पोलिसांना पाहताच कारमध्ये असलेले दोन जण पळून गेले. कारच्या झडतीत पोलिसांना एक गाय मिळाली. तिला अत्यंत क्रुरपणे कोंबण्यात आले होते.

चौकशीत ती कार कामगारनगर परिसरात राहणाऱ्या अभिजित उर्फ काली ठाकूरची असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी कार जप्त करून गायीला गोशाळेत रवाना केले. काली ठाकूरचा शोध सुरू आहे.

# हॉटेल, रेस्टॉरेंटमध्ये मतदारांना विशेष सूट द्या : डॉ. अभिजीत चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत नागपूर शहरातील मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे यासाठी, हॉटेल, रेस्टॉरंट चालकांनी मतदानाच्या दिवसापासून तीन दिवस आपल्या आस्थापनांमध्ये मतदाराला विशेष सूट द्यावी असे आवाहन नागपूर महानगरपलिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभा कक्षात शुक्रवारी (ता: २५) मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेत नागपूर शहरातील हॉटेल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. याप्रसंगी मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, मुख्य अग्निशमन अधिकारी बी. पी. चंदनखेडे, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, हॉटेल असोसिएशनचे तेजेंदर सिंग रेणू, ऋषी तुली, अजय जैस्वाल, तरुण मोटवानी, मनोज अवचट,वासूदेव त्रिवेदी, विशाल जैस्वाल, नितीन त्रिवेदी, विनोद जोशी, विजय चौरसिया, हरमनजीत सिंग बावेजा, इंद्रजीत सिंग बावेजा प्रामुख्याने उपस्थित होते.




बैठकीत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी मतदान होणार आहे.

त्यापूर्वी पासूनच हॉटेल, रेस्टॉरेंट चालकांना स्वीपच्या माध्यमातून आपल्या आस्थापनेवर येणाऱ्या मतदारांना मतदानाविषयी जागृत करावे, मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करावे, त्याकरिता आपल्या आस्थापनेवर दर्शनीय ठिकाणी जनजागृती फलक लावावेत, तसेच हॉटेल, रेस्टॉरेंट चालकांनी मतदानाच्या दिवसापासून तीन दिवस आपल्या आस्थापनांमध्ये मतदाराला विशेष सूट द्यावी असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. चौधरी यांनी केले.

यावेळी हॉटेल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत आवश्यक जनजागृती करण्याची ग्वाही दिली.